cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१३६ | शुक्रवार दि.०६ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### रेटारेटीत भाजपा अन् ठाकरे शिवसेनेची घुसमट !

महाराष्ट्रात महायुती आणि महाआघाडी या दोन्ही तंबूत जागावाटप या विषयावरुन धुमशान सुरु आहे. लहान भाऊ, मोठा भाऊ, सर्वे आणि चेहरा असे वेगवेगळे नियम सांगत आतल्या आत रेटारेटी सुरु आहे. या सर्वाचा भाजपाला आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला फटका बसण्याची शक्यता दिसते आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षात घुसमट सुरु आहे. मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे आणि अजितदादा यांच्या चाली आणि शरद पवार गेम खेळत असले तरी हे पद पदरात पाडून घ्यायचेच असा काँग्रेसचा मनसुबा आहे

### दिव्यांगांना एस.टी.महामंडळच्या सर्व बसेसमध्ये कायमस्वरूपी आरक्षण

मुंबई : दिव्यांग प्रवाशांना यापुढे एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये आरक्षित आसन कायमस्वरूपी देण्यात आले असून, ते कोणत्याही थांब्यावर चढल्यास त्यांना त्यांचे आरक्षित आसन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित वाहकाची असणार आहे. त्यामुळे दिव्यांगाचा प्रवास यापुढे अधिक सुखकर व आरामदायी होणार आहे. एसटी महामंडळाच्या वाहतूक विभागाने एक परिपत्रक काढून एसटीच्या वेगवेगळ्या प्रकारच्या बसेस मध्ये दिव्यांगांना आरक्षण आसने निश्चित केलेली आहेत. साध्या बसेसपासून शिवनेरी बसेसपर्यंत दिव्यांग प्रवाशांना प्रवासाच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांचे आरक्षित आसन केवळ त्यांच्यासाठी राखीव ठेवण्याचे सूचना एस.टी. महामंडळाने स्थानिक एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत.

# शेतकऱ्यांनी कांदा विक्री थांबवावी!

## अभ्यासकांचा सल्ला, नाफेडची देशभरात कांद्याची ३५ रुपये किलोने थेट विक्री

**मुंबई । प्रतिनिधी**

**सरकारने स्टॉकमधला कांदा बाजारात विक्रीसाठी काढला. सरकारच्या या निर्णयामुळे बाजारात कांद्याचे भाव ४०० रुपयांपर्यंत नरमले. पण कांद्याच्या भावात मोठी पडझड होण्याची शक्यता दिसत नाही. कारण नाफेडकडे जेवढा कांदा आहे तो कांदा पूर्ण देशाला १० दिवसही पुरणार नाही. तसेच सध्या देशात उपलब्ध कांद्याचा स्टॉकही कमी आहे आणि खरिपातील कांद्याचेही नुकसान होत आहे. यामुळे केवळ नाफेडच्या कांदा विक्रीमुळे बाजारावर मोठा परिणाम होण्याची शक्यता कमीच आहे. फक्त गरज आहे पॅनिक सेलिंग टाळण्याची आणि टप्प्याटप्प्याने कांदा विकण्याची. असे यातील अभ्यासकांनी म्हटले आहे.**

मागील दोन दिवसांमध्ये देशभरातील बाजारांमध्ये कांदा आवक जास्त आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील आवक



महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक आहे. याचा दबाव दरावर वाढला. परिणामी भावात मागील दोन दिवसांमध्ये क्विंटलमागे ४०० रुपयांपर्यंत नरमाई आली. कांद्याचा सरासरी भाव ४ हजार ते ४ हजार ३०० रुपयांपासून कमी होऊन आज ३ हजार ४०० ते ३ हजार ९०० रुपयांपर्यंत आला. विशेष म्हणजे नाफेड आणि एसीसीएफने विक्रीसाठी केंद्रे सुरु केल्यानंतर बाजारात पॅनिक सेलिंग सुरु झाले आहे. नाफेडच्या कांद्यापेक्षा पॅनिक सेलिंगचा दबाव कांद्यावर जास्त आला, असे कांदा बाजारातील अभ्यासकांनी ◄◄ पान २ वर

### सरकारकडे असलेल्या स्टॉकबाबत संभ्रम

सरकारकडे सध्या कांद्याचा स्टॉक पावणे पाच लाख टन असल्याचे सांगितले जाते. पण सरकारकडे म्हणजेच नाफेड आणि एनसीसीएफकडे एवढा स्टॉकच नाही, अशी माहीती अभ्यासकांनी दिली. काहीजणांच्या मते नाफेड आणि एनसीसीएफकडे ३ ते ३.५ लाख टनांचा स्टॉक असू शकतो तर काही जणांच्या मते २.५ लाख टनांपेक्षा जास्त स्टॉक नसावा. कारण या दोन्ही संस्थांकडे कोणत्या केंद्रांवर किती स्टॉक उपलब्ध आहे, याची आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे नाफेड आणि एनसीसीएफकडे नेमका स्टॉक किती? सरकार सांगते तेवढा आहे का? हा मुळ प्रश्न आहे.

### शेतकऱ्यांनी दिवाळीपर्यंत विक्रीचे नियोजन करावे

कांद्याचे पॅनिक सेलिंग टाळून टप्प्याटप्प्याने विक्री केल्यास शेतकऱ्यांना फायदेशीर ठरू शकते, असेही अभ्यासकांनी सांगितले. यापुढेही बाजारात व्यापाऱ्यांची तेजी-मंदी, नाफेडची कांदा विक्री आणि सरकारचे धोरण यामुळे दरात चढ उतार राहू शकतात. पण शेतकऱ्यांनी पॅनिक सेलिंग टाळून दिवाळीपर्यंत कांदा विक्रीचे नियोजन केल्यास फायदेशीर ठरेल.

## महाराष्ट्राच्या डीएनएमध्ये काँग्रेसची विचारधारा-खा.राहुल गांधी

**सांगली । प्रतिनिधी**

**पूर्वी राजकारण व्हायचे, पण आज वैचारिक लढा सुरू आहे. भारताला सामाजिक प्रगती हवी आहे. पण त्याचा फायदा काही निवडक लोकांनाच मिळत आहे. देशातील २०, २५ उद्योगपतीचे १६ लाख कोटी रूपये कर्ज सरकारने माफ केले. काँग्रेसच्या काळात आम्ही शेतकऱ्यांचे ७० कोटी कर्ज माफ केले होते, त्यामुळे आता देखील शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे, काँग्रेसची विचारधारा महाराष्ट्राच्या डीएनएमध्ये आहे, असे खासदार राहुल गांधी यांनी म्हटले आहे.**



काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी गुरूवारी (दि.५ सप्टेंबर) महराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. दरम्यान राहुल गांधींच्या हस्ते पतंगराव कदमांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आले. यानंतर सांगलीत जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

सावरकरांच्या मुद्यावरून मोदींनी केलेल्या टीकेला राहुल गांधी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. यावेळी ते म्हणाले, चुकीचे काम करणारे माफी मागतात. चुक केली नाही तर माफी मागायची वेळच येत नाही. देशातील चुकीचा जीएसटी, नोटाबंदी, तरुणांना रोजगार देऊ न शकणे, याबाबत मोदी सरकारने माफी मागावी असे म्हणत राहुल यांनी पीएम मोदींवर देखील निशाणा साधला. आम्हाला द्वेषाचे राजकारण करायचे नाही तर प्रेमाचे आणि एकीचे राजकारण आम्हाला हवे आहे, असेही खासदार राहुल गांधी यांनी यावेळी जाहीर सभेमध्ये स्पष्ट केले.

## केजरीवालांच्या अटकेप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची सीबीआयला फटकार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**दिल्ली लीकर पॉलिसी प्रकरणी ईडीच्या अटकेत असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा सीबीआयने अटक केली. या अटकेवरून सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयवर फटकारत ताशेरे ओढले आहेत. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जेव्हा तुम्ही कोठडीत असाल तुम्ही त्यांना पुन्हा अटक करत असाल, तर तुम्हाला न्यायालयाची परवानगी घ्यावी लागेल. फौजदारी प्रक्रिया संहितेत काहीतरी आहे, अशी आठवणही यावेळी सीबीआयला न्यायालयाने करून दिली.**



सीबीआयने केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या आणि नियमित जामीन मिळावा यासाठी केजरीवाल यांच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात गुरूवारी सुनावणी झाली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला फटकारले. सर्वोच्च न्यायालयाने आम आदमी पक्षाच्या प्रमुख अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने अटक केल्याप्रकरणी या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आणि ◄◄ पान २ वर

## पुणे-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग सुधारणेसाठी ९ हजार कोटी

**मुंबई । प्रतिनिधी**

सध्याच्या पुणे-शिरुर-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय गुरूवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. पुणे ते शिरुर हा ५३ कि.मी. चा मार्ग सहा पदरी उन्नत करण्यात येणार असून एमएसआयडीसीमार्फत हे काम केले जाईल. यासाठी ७ हजार ५१५ कोटी खर्च अपेक्षित आहे. शिरुर, अहमदनगर बाह्यवळण रस्ता मार्गे छत्रपती संभाजीनगर हा सध्याचा रस्ता सुधारण्यासाठी २ हजार ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. शिरुर ते अहमदनगर या मार्गामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पथकर वसुली होत आहे. त्यामुळे ही पथकर वसुली संपल्यानंतर हा मार्ग हस्तांतरित करण्यात येईल. अहमदनगर ते देवगड हा रस्ता सुधारण्यासाठी तो एमएसआयडीसीला हस्तांतरित करण्यात येईल. तसेच देवगड ते छत्रपती संभाजीनगर या मार्गांवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पथकर वसुली होत आहे. ती संपुष्टात आल्यानंतर हा मार्ग एमएसआयडीसीला हस्तांतरित करण्यात येईल.

## आम्ही लाडक्या बहिणींना २००० रुपये देणार-मल्लिकार्जुन खर्गे

**सांगली । प्रतिनिधी**

**काँग्रेसचे राष्ट्राय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्र दौऱ्यात सांगलीतून भाषण करताना राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी घोषणा केली. आमचे सरकार आल्यास आम्ही लाडक्या बहिणींना दोन हजार रुपये महिन्याला देऊ, असे मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटले. विशेष म्हणजे यावेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि खासदार राहुल गांधी हेही व्यासपीठावर** उपस्थित होते.

मल्लिकार्जुन खर्गे हे सांगलीत दिवंगत नेते पतंगराव कदम यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी, बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. तसेच, राज्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यासंदर्भात आणि लाडकी बहीण योजनेबाबतही भाष्य केले. लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी हे १ लाख ७० हजार ◄◄ पान २ वर



## धारूर तालुक्यातील सुकळी गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करणार

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील सुकळी गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.**

यासाठी ११ कोटी ९३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील १५ हजार ४२० चौ. मीटर क्षेत्रावरील घरे रिकामी होणार असून ही जमीन महामंडळास वर्ग करण्यात येईल. सुकळी हे गाव गुणवंती पाटबंधारे प्रकल्पाच्या खालच्या बाजूस दीडशे मिटर अंतरावर असून हे गाव बुडीत क्षेत्रामध्ये येत नसल्यामुळे त्याचे पुनर्वसन करण्यात आले नव्हते. मात्र, धरणाच्या खालील बाजूस असल्यामुळे या गावात सातत्याने ओलावा राहणे, साप निघणे, रोग उद्भवणे असे प्रकार वारंवार या गावात होत आहेत. त्यामुळे खास बाब म्हणून हा निर्णय घेण्यात आला.

## माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नातून आष्टी मतदारसंघातील ३५ ग्रामपंचायत इमारत बांधकामास मंजूरी

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या स्वतःच्या इमारती नसलेल्या १२६ ग्रामपंचायतींना माजी ग्रामविकास मंत्री आमदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून स्वतंत्र ग्रामपंचायत इमारत बांधकामास स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत शासन निर्णय दि.१६ ऑगस्ट २०२४ नुसार देण्यात आली असून या अपूर्व योगदानाबद्दल माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आभार व्यक्त केले आहेत अशी माहिती देताना सुरेश धस आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, ग्रामपंचायत म्हणजे गावची संसद असते.. आजवर आपल्या जिल्ह्यातील अनेक गावांना स्वतःची वेगळी ग्रामपंचायत इमारत नव्हती. त्यामुळे माजी ग्रामीण विकास मंत्री लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांतून बीड जिल्ह्यातील १२६ स्वतंत्र ग्रामपंचायतींना त्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींना इमारत बांधकामास ७ कोटी ४० लक्ष रुपये मंजुरी मिळाली आहे.



याबाबत दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी शासन निर्णया द्वारे राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची ◄◄ पान २ वर



मुंबईः राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी ॲड. सुभाष राऊत यांची निवड केल्याबद्दल राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांचे आभार व्यक्त करताना राऊत परिवारातील संपूर्ण सदस्य उपस्थित होते.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | २,६१० | ३,२८० | २,८११ |
| ज्वारी/हायब्रिड :१२३.०० क्विंटल | २,००० | ३,००१ | २,२७० |
| मूग : १११.०० क्विंटल | ५,९०० | ८,२७५ | ७,५७९ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ५६.५० क्विंटल | ७,००१ | ८,००० | ७,५७९ |
| बाजरी:२६.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,४४८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ७,२०० | ६,७०० |

# देवस्थानांच्या विकासासाठी २७५ कोटी!

## बीड, जालना, नागपूर आणि कोल्हापूरमध्ये सुशोभीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

**श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.**



राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक गुरूवारी मंत्रालयात पार पडली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, यंदाचे वर्ष हे ◄◄ पान २ वर

### या ठिकाणच्या देवस्थानांना निधी

या बैठकीत ग्रामविकास विभागाच्या अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी, बीड जिल्ह्यातील श्री पांचाळेश्वर तीर्थक्षेत्रासाठी ७ कोटी ९० लाख, श्री क्षेत्र पोहीचा देव तीर्थक्षेत्रासाठी ४ कोटी ५४ लाख, जालना जिल्ह्यातील जाळीचा देव तीर्थक्षेत्रासाठी २३ कोटी ९९ लाखाच्या वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींच्या आणि कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे येथील शिव पार्वती तलावाच्या सुशोभीकरणासाठी १४ कोटी ९७ लाखाच्या निधीला मंजूरी देण्यात आली.

cmyk

## अग्रलेख

# रेटारेटीत भाजपा अन् ठाकरे शिवसेनेची घुसमट!

महाराष्ट्रात महायुती आणि महाआघाडी या दोन्ही तंबूत जागावाटप या विषयावरुन धुमशान सुरु आहे. लहान भाऊ, मोठा भाऊ, सर्वे आणि चेहरा असे वेगवेगळे नियम सांगत आतल्या आत रेटारेटी सुरु आहे. या सर्वाचा भाजपाला आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला फटका बसण्याची शक्यता दिसते आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षात घुसमट सुरु आहे. मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे आणि अजितदादा यांच्या चाली आणि शरद पवार गेम खेळत असले तरी हे पद पदरात पाडून घ्यायचेच असा काँग्रेसचा मनसुबा आहे आणि या शर्यतीत काँग्रेसकडून डॉ. विश्वजीत कदम यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. शिक्षकदिनी पाच सप्टेंबरला कडेगांव येथे दिवंगत नेते डॉक्टर पतंगराव कदम यांच्या स्मारकाचे उदघाटन काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या हस्ते झाले. या मेळाव्यात काँग्रेसला आपला अंदाज येईलच पण महाआघाडीला आपला मोठा भाऊ आणि चेहरा लक्षात येईल असा सांगली पॅटर्न राबवला जात आहे.

महाआघाडीत मुख्यमंत्री पदाचा चेहरा उद्धव ठाकरे ठरवा. शिवसेनेला जागावाटपात मोठा वाटा मिळावा यासाठी शिवसेना ठाकरे गट आग्रही आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत ठाकरे शिवाय महाराष्ट्राला पसंत पडेल असा दुसरा चेहरा आहेच कोण? असे विचारत चेहरा जाहीर करा अशी मागणी करत आहेत. राऊत यांनी उद्धव ठाकरे यांना दिल्ली दरबारी नेऊन काँग्रेस नेत्यांना भेटवले पण काँगेसने शुन्य प्रतिसाद दिला. महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी उद्धव ठाकरे यांच्या चुका वेळोवेळी त्यांच्या पदरात घातल्या आहेतच पण ठाकरेंनी मुख्यमंत्री पदाचा घाईघाईने राजीनामा दिला यांचाही त्यांना राग आहे. पृथ्वीराज चव्हाणांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाला त्यांची जागा दाखवत तुम्ही महाआघाडीत तिसऱ्या स्थानी आहात असे जाहीरपणे सांगितले आहे. काँग्रेसने अंतर्गत महाराष्ट्राचा सर्वे करुन घेतला त्यामध्ये काँगेसला १०० जागा, राष्ट्रवादी शरद पवार गटाला ६० जागा आणि ठाकरे यांना ३०-३५ जागी विजय दाखवला आहे. थोडक्यात महाआघाडीत शिवसेनेचा अंकुश हटला आहे. ठाकरे यांना काँग्रेसने आरसा दाखवल्याने त्याची अवस्था सांगता येत नाही, सहन होत नाही अशी झाली आहे. शिवसेना फुटली आणि चाळीस आमदार एकनाथ शिंदे सोबत गेले पण ठाकरे यांनी महाराष्ट्र पिंजून गेलेल्या आमदारांच्या मतदारसंघात पर्याय उभे केले नाहीत. उलट शरद पवार यांनी या वयातही पक्षाची नव्याने मांडणी करत युवकांची फळी उभी केली. समरजीतसिंग घाडगे, हर्षवर्धन पाटील ही पुढे आलेली नावे पण भाजपाचे २४ आमदार शरद पवारांची तुतारी वाजवणार असे बोलले जात आहे. शरद पवार यांनी आमचा पक्ष तूर्त मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत नाही. भाजपला हटवणे हाच मुख्य कार्यक्रम आहे. नंतर बघू मुख्यमंत्री कोण? असं म्हणत ठाकरे यांना एकाकी पाडले आहे. ठाकरेना अंधारात ठेऊन शरद पवार यांनी दोनवेळा घेतलेली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट पडद्यामागे काही तरी शिजते आहे हे सांगणारी आहे. ओघानेच एकीकडे शिवसेना ठाकरे गट आणि दुसरीकडे भाजप अडचणीत दिसतो आहे. एकनाथ शिंदे हे आपला गट घट्ट धरून आहेत. शंभर जागांची त्यांची मागणी आहे. गेल्या भावात त्यांना सत्तर जागा तरी मिळतील अजितदादानाही ८० जागा हव्या आहेत त्यांना सोबत आलेल्या आमदारांना पन्नास जागा आणि काँग्रेसचे दोन आमदार त्यांच्यासोबत आहेत त्यांच्यासाठी जागा द्यावी लागेल. अजितदादाना सोबत घेतले म्हणून समरजीतसिंग घाडगे आणि हर्षवर्धन पाटील भाजप सोडत आहेत, असे २४ आमदार आहेत. भाजपाचे १०५ आमदार आहेत आणि गेल्यावेळी भाजपाने महायुतीतून १६० जागा लढवल्या होत्या. यावेळी भाजपला जागा मिळतील पण जिंकून येतील अशा जागा कमी मिळतील असे दिसते. अजित पवार यांना महायुतीत घेतल्याचा तो फटका बसणार आहे. काँग्रेसने केलेल्या सर्वेक्षणात महायुतीत भाजपला ८० जागा, एकनाथ शिंदे यांना ३० जागा आणि अजितदादा यांना आठ जागा दाखवण्यात आल्या आहेत.

महायुतीला लाडकी बहीण योजना गेम चेंजिंग पॉइंट ठरेल असे वाटते, शेतकरी विद्युत बील माफी व मोफत वीज या निर्णयामुळे महायुतीला सहानुभूती मिळेल, भरभरून मते मिळतील असा कयास आहे. पण मालवणमधील पुतळा आणि बदलापूरमधील संतापजनक घटना यामुळे ही सहानुभूती दूर गेली आहे. मराठा आरक्षण प्रश्न आणि जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांचा आणि भाजपचा पाय ठेचायचा बांधलेला चंग यामुळे भाजप अडचणीत दिसते आहे. वंचीतचे प्रकाश आंबेडकर तिसऱ्या आघाडीच्या प्रयत्नात आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वतंत्र लढणार आहे. गणेशोत्सव झाला की पक्ष पंधरवडा असतो. त्यामुळे त्याआधी किंवा नंतर लगेचच जागावाटप, तिकीट वाटप जाहीर होईल. तिकीट वाटप होताच तूल्यबळ इच्छुक इकडे तिकडे उड्या मारतील. घरवापसी, मेगाभरती अशी त्याला नावे दिली जातील पण काँग्रेसने आणि शरद पवार यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही आपला गट आणि जोर कायम ठेऊन आहेत. भाजप आणि उद्धव ठाकरे यांना अडचणी दिसत आहेत. प्रत्येक मतदारसंघात इच्छुक संख्या मोठी आहे. काही मंडळी विजयासाठी उभी आहेत तर काही मंडळी कुणालातरी पाडण्यासाठी, मते खाण्यासाठी दंड थोपटू लागली आहेत. मतदार राजाच्या मनात काय आहे हे कळेना झाले आहे. तूर्त जागावाटपाचा घोळ सुरु आहे आणि काँग्रेसचे युवराज सांगली कडेगावातून दंड थोपटून महाराष्ट्र जिंकायला सरसावत आहेत.

# श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-विश्वस्त

**शिरुर कासार । प्रतिनिधी**

**प्रात:स्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभलेली श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील पार्थिव पूजेची सांगता उत्सव आज दिनांक चार बुधवार रोजी मोठ्या थाटात व उत्साहाच्या वातावरणामध्ये साजरा होत असून या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ गगडाच्या विश्वस्थांनी केले आहे.**

श्री संत वामनभाऊ महाराज यांनी श्रावण महिन्यात श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर महिनाभर पार्थिव पूजेची सुरुवात केली तीच परंपरा आज तागायत महंत गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांनी ती पुढे चालू ठेवली असून आजही गेली महिनाभर ते स्वतः ही पूजा करतात महिन्याच्या शेवटी प्रतिपदेला म्हणजे करी या दिवशी या उत्सवाची सांगता मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये करून हजारो भाविकांना मिस्टन्नाचाचा महाप्रसाद दिला जातो यामुळे पूर्वीच्या जुनाट वाईट प्रथा बंद होते या मागचा खरा उद्देश आहे श्री संत वामनभाऊ महाराज यांचा होता पूर्वी या भागात पोळ्याच्या करीला सर्वत्र नको ते भक्षण केले जात असे म्हणून आणी या द्वारे हजारो पशुंचा बळी घेतला जात असे यामुळे भाऊंनी ही प्रथा करीच्या दिवसाला साजरी केली या उत्सव प्रारंभ केला होता तो आजही गुरुवर्य महंत विठ्ठल महाराज स्वतः महिनाभर दररोज वारुळाच्या मातीचे शिवलिंग तयार करून दररोज विसर्जित करतात यास पार्थिव पूजा असे म्हटले जाते ती पूजा उत्सव आज दिनांक चार बुधवार रोजी सकाळी एक ते दुपारी एक वाजेपर्यंत होऊन दुपारी महाप्रसाद प्रसादाने या उत्सवाची सांगता होणार आहे तेव्हा या सोहळ्याला सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांची विश्वस्तांनी केले आहे.

# शाडू मातीपासून प्रदूषण मुक्त श्री गणेशमूर्ती

**घनसावंगी । प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत घनसावंगी नगरपंचायत तर्फे पर्यावरणपूरक इकोफ्रेंडली गणपती बाप्पा, शाडु मातीपासून प्रदुषण मुक्त श्री गणेशमूर्ती बनवण्यासाठीची कार्यशाळा४ सप्टेंबर रोजी नगरपंचायत कार्यालयात संपन्न झाली. सदरील कार्यशाळेस घनसावंगी शहरातील संत रामदास महाविद्यालय, कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालय, कै. दादासाहेब देशमुख जि. प.प्रशाळाच्या अनेक विद्यार्थींनी-विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच शाडू मातीपासून पर्यावरणपूरक इकोफ्रेंडली गणपती बाप्पाच्या मूर्ती बनवल्या. यावेळी प्रशिक्षक श्रीमती श्रुती कुलकर्णी-लाटे यांनी शाडू मातीपासून श्रींची मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच प्रदूषण मुक्त गणेशोत्सव साजरा करणे बाबत विविध विषयांवर मार्गदर्शन



दिले. सदरील कार्यशाळा जालना जिल्हा प्रशासन अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपंचायत श्री.दीपक इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरपंचायतचे नगराध्यक्ष श्री.पांडुरंग कथले, उपाध्यक्ष श्री मुमताज शेख, सर्व विषय समितीचे सभापती, सर्व नगरसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. सदरील कार्यशाळे घनसावंगी नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक श्री सुनील वाघ, बाळासाहेब कानडे, गणेश देशमुख,दीपक आढावे,ज्ञानेश्वर सोमवारे,राजू भारस्कर, शेख महेबूब, सखाराम नाईक,सुरेश खंदारे,राजू वजीर,अश्फाक शेख,विष्णु कदम,कांता सोमवारे,भागवत धाईत,अन्वर सय्यद,बाळू बिडवे,सचिन गायकवाड ई उपस्थित होते.

# कापूस व सोयाबीन अर्थसहाय्य मंजूर लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार-जिल्हाधिकारी श्रीकृष्णा पांचाळ

**जालना । प्रतिनिधी**

**महसूल व वन विभाग शासन निर्णयान्वये ई-पीक पाहणी बाबतची माहिती भ्रमणध्वनीमधील ॲपद्वारे गाव नमुना १२ मध्ये नोंदविण्यासाठी कार्यपध्दती निश्चित केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ई-पीक पाहणी प्रकल्प क्षेत्रीय स्तरावर महसूल व कृषी विभागाने संयुक्तरित्या राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यात ई-पीक पाहणी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. जे शेतकरी ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर त्यांचा पीक पेरा नोंदणी करणार नाहीत त्यांना पीक कर्ज, पीक विमा, नुकसानभरपाईसह इतर शासकीय योजनाचा लाभ मिळणार नाही. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंदणी तातडीने करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.**



ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या, अनुषंगाने सर्व तालुकास्तरावर प्रचार प्रसार, प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे ई-पीक पाहणीची नोंदणी करण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आलेले आहे. जालना जिल्ह्यात दि. १ ऑगस्ट २०२४ पासून खरीप हंगाम ई-पीक पाहणीची सुरवात झाली असून चालु हंगामासाठी सुधारित मोबाईल ई- पीक पाहणी ॲप (डीसीएस) व्हर्जन ३.०.०.० गुगल प्लेस्टोअरवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. वर्ष २०२३ च्या खरीप हंगामातील कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभागाच्या दि. २९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय देण्यासाठी सुचित केले आहे. या शासन निर्णयात राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप, पोर्टलव्दारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र राहतील. ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर नोंद असलेल्या क्षेत्रानुसार व त्याप्रमाणात परिगणना करून अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. याप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहेत. मोबाईल ॲप प्रणालीवर पीक पेरा नोंदणीबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर प्रचार, जनजागृती करण्यात आलेली आहे

# अतिवृष्टीग्रस्त भागाचे सरसकट पंचनामे करून जिरायतीसाठी १३ हजार, बागायती २७ हजार व फळबागांसाठी ३६ हजारांची तातडीने मदत करा

**जालना । प्रतिनिधी**

**३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरच्या दरम्यान वादळी वा-यासह मुसळधार पाऊस पडून जिल्हयातील सर्व महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे.या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे शेतक-यांचे शेती व पिकांचे संपूर्णपणे नुकसान झाले असून अतिवृष्टी ग्रस्त भागाचे सरसकट पंचनामे करून जिरायतीसाठी १३ हजार,बागायतीसाठी २७ हजार व फळबागांसाठी ३६ हजाराची तातडीने मदत करा असे माजी मंत्री आ.राजेश टोपे यांनी मागणी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री मा.ना.एकनाथ शिंदे यांना महाविकास आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली.**



शेती-खरीप व फळबागांचे नुकसान: मोठ्या प्रमाणावर मुसळधार पाऊस व अतिवृष्टी झाल्याने अनेक ठिकाणी जमीनी खरडून गेलेल्या आहेत. शेतामध्ये उभी असलेली कापूस, तूर, सोयाबीन, मुग उडीद या खरीप पिकांचे पूर्णणे नुकसान झालेले आहे. तसेच पालेभाज्यासह मोसंबी, डाळिंब, द्राक्ष, पपई, आंबा, पेरु, केळी, चिकू, सिताफळ या फळबागांचे सुध्दा मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. जमीनी खरडून जाणे अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे तसेच कांही ठिकाणी पाझर तलाव फुटल्याने जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी शेतक-यांच्या जमीनी खरडून व वाहून गेलेल्या आहेत. पिक विमा खरीप पिकांचे अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. खरीप पिक विमा हा स्थानिक नैसर्गीक आपत्ती (लोकॅलाईजड क्लॅमीटी) कॅर्टगिरीमध्ये येतो. यामध्ये विमा कंपनीला ७२ तासाच्या आतमध्ये कळवावे लागते. विमा कंपनीने दिलेला टोलफ्री क्रमांक १४४४७ व क्रॉप इन्शुरन्स ॲप व्दारे बंद असल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी आहे.कृषि विभागाने गंभीर दखल घेवून विमा धारकांना विमा रक्कम मिळवून द्यावी. फळबाग विमा : फळबाग विमा हा हवामान आधारीत आहे. अतिवृष्टी व सर्वदूर पाऊस झाल्याने मोठया प्रमाणावर फळगळ होऊन शेतक-यांचे मोठया प्रमाणावर फळबागांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे १०० टक्के विम्याचे पैसे शेतक-यांना मिळाले पाहिजे, याबाबत आपण तातडीने उचित कार्यवाही करावी. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान: अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे दळण-वळण पुर्णपणे ठप्प झालेले आहे. यामुळे कांही गांवाचा संपर्क तुटला, शालेय विद्यार्थी, रुग्ण, वयोवृध्द नागरिक यांची मोठ्याप्रमाणावर गैरसोय झालेली आहे. त्यामुळे तात्काळ रस्ते व पुलांची दुरुस्ती करुन जनजीवन सुरळीत करावे. शाळा खोल्या, वॉल कंपाऊंड, स्मशानभूमी वॉलकंपाऊंडची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आह, ते सुध्दा तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे. रस्ते व पुल दुरुस्तीसाठी प्रस्ताव तयार करुन मधून निधी मंजुर करुन तातडीने रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्यात यावी. महावितरण: अनेक ठिकाणी ट्रान्सफार्मर, ११ केव्ही लाईन तसेच एलटी लाईन, पोल पडलेले असल्यामुळे त्या भागातील विज पुरवठा बंद आहे. त्यामुळे लोकांना शेतीची लाईट, गांवातील लाईट बंद झाल्याने गैरसोय निर्माण झाली आहे. तातडीने या सर्व गोष्टी दुरुस्त करुन विज पुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यात यावा. वैयक्तीक नुकसान: नवी व नाल्याच्या बाजूस असलेल्या अनेक घरांमध्ये पाणी शिरुन घरोपयोगी वस्ती व अन्नधान्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तसेच अनेक गांवात घरांची पडझड झालेली आहे. शासनाचे स्थायी आदेशाप्रमाणे अशा बाधीत कुटुंबाना तात्काळ मदत देण्यात यावी. तसेच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे असलेले पशुधन गाय, बैल, म्हैस, शेळी, कोंबड्या इत्यादी पशुधन पाण्यात वाहुन गेले व मृत्युमुखी पडलेले आहेत. तसेच घनसावंगी तालुक्यामध्ये बाणेगांव व रांजणी येथील दोन नागरिक पुराच्या पाण्यामध्ये बाहुन जाऊन मृत्युमुखी पडलेले आहे. तातडीने याचे पंचनामे करून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात यावी. बँककर्ज वसूली : शेतामधील खरीप पिकांचे पूर्णपणे नुकसान झाल्याने शेतकरी कर्ज भरु शकणार नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारे सक्तीची कर्ज वसुली न करता कर्जाचे पुनर्गठण करण्यात यावे. तसेच रब्बी पिकांसाठी नव्याने कर्ज देण्यात यावेत. संपूर्ण जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अस्मानी संकटाने हिरावून घेतलेला आहे. शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून तो मोठ्घा आर्थिक विवंचनेत सापडला आहे. जिल्ह्यामध्ये ओला दुष्काळ जाहीर करण्याबाबत व त्याअनुषंगाने विजबील वसूली, कर्ज वसूली करु नये, शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशा व या अनुषंगाने दुष्काळाच्या सर्व सवलती लागू करण्यात याव्यात. झालेल्या सर्व नूकसानीचे सरसकट पंचनामे तातडीने करण्यात यावेत. शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ जिरायती पिकांसाठी हेक्टरी रु. १३०००/-, बागायतीसाठी हेक्टरी रु. २७०००/- व फळबागांसाठी हेक्टरी रु.३६०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी असे महाविकास आघाडीच्या वतीने निवेदनात नमुद केले आहे. यावेळी माजी आ.सुरेश जेथलीया, माजी आ.चंद्रकांत दानवे,माजी आ.संतोष सांबरे,मा.भास्करराव आंबेकर, मा.ए.जे.बोराडे,, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, मा.डॉ.निसार देशमुख, बबलु चौधरीमा.कपिल आकात, सौ.सुरेखा लहाने, मा.सतिष होंडे, मा.कल्यान सपाटे, तांबोळी, मा.जयप्रका यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांनी कांदा

सांगितले. सरकार म्हणते त्याप्रमाणे पावणे पाच लाख टन कांदा आहे. हा कांद्याची सरकार आता किरकोळ विक्री करत आहे. देशाचा विचार केला तर रोज ५० ते ५५ हजार टन कांदा लागतो. म्हणजेच देशभरात दिवसाला ५० ते ५५ हजार टन कांदा खाल्ला जातो. आता सरकार म्हणते तेवढा कांदा स्टॉकमध्ये असेल तर हा कांदा देशाला १० दिवसही पुरणार नाही. मात्र बाजारात चर्चा आहे तेवढा कांदा असेल तर ५ ते ७ दिवस पुरेल. सध्या उपलब्ध स्टॉकपैकी जास्त स्टॉक व्यापाऱ्यांकडे आहे. पुढच्या दोन-तीन आठवड्यांमध्ये शेतकऱ्यांकडील स्टॉक आणखी कमी होईल. कांद्याचा जास्तीत जास्त स्टॉक व्यापाऱ्यांच्या हाती जाईल. व्यापारी नव्या मालाची बाजारात आवक वाढेपर्यंत तेजी मंदी करत राहणार. म्हणजेच नाफेडने कांदा विक्री केली तरी तेवढ्यापुरता बाजारावर परिणाम होऊ शकतो. पण सध्यातरी कांदा बाजारात कायमस्वरुपी मंदीचे चित्र दिसत नाही, असे अभ्यासकांनी सांगितले.

---------

### केजरीवालांच्या अटकेप्रकरणी सर्वोच्च

अंतरिम जामीन मागणाऱ्या याचिकेवरील सुनावणी वेळी मत व्यक्त केले. तसेच या प्रकरणाचा आदेश राखून ठेवला. अरविंद केजरीवाल यांच्या बाजूने युक्तीवाद करताना ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी म्हणाले की, याबाबत सुरक्षितता असायला हवी. तुम्ही कोणत्याही आधाराशिवाय अटक करू शकत नाही. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना ईडीने २१ मार्च रोजी कथित मद्य धोरण घोटाळ्यातून उद्भवलेल्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात प्रथम अटक केली होती. सीबीआयने २६ जून रोजी एका भ्रष्टाचार प्रकरणात त्यांना अटक केली होती. केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने १२ जुलै रोजी जामीन मंजूर केला होता पण सीबीआयने अटक केल्यामुळे ते तिहार तुरुंगात आहेत.

-------

### आम्ही लाडक्या बहिणींना २०००

मतांनी जिंकले आहेत. मात्र, विश्वजीत कदम हे एका विधानसभेत १ लाख ४० हजार मतांनी जिंकल्याचे सांगत खर्गे यांनी मोदींवर टीका केली. तसेच, शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हात लावला तो पडला, राम मंदीराला हात लावला ते गळत आहे, गुजराच्या पुलाचे उद्घाटन केल तर तो पुल पडला, मोदी येत आहेत, म्हणून पुतळा लवकर बनवा आणि तो बनवला आणि पडला, असे म्हणत पुतळा कोसळल्यावरुन नरेंद्र मोदींना त्यांनी लक्ष्य केले. आमचे सरकार आल्यास लाडकी बहिण योजनेसाठी २ हजार रुपये देणार, तुम्ही तुमचा सन्मान मोदी यांच्यासमोर गहाण ठेवणार आहात का, मोदी सरकारने तोडण्या फोडण्याच्या पलिकडे काय केले ते सांगा, महाराष्ट्र जर जिंकला तर सारा देश जिंकेल आणि लवकरच भाजपच सरकार जाईल, असेही खर्गे यांनी म्हटले.

-----------

### देवस्थानांच्या विकासासाठी

श्री चक्रधर स्वामींचे अष्टशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. तसेच आज त्यांची जयंती आहे, यानिमित्ताने महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भक्तीधाम प्रल्हादपूर येथील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, यासाठी दोन टप्प्यात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच संत सावता माळी यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अरण या गावाला अ वर्ग तीर्थक्षेत्र जाहीर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

---------

### माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नातून आष्टी

इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना'' अंतर्गत माजी मंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नांने आष्टी तालुक्यातील नांदा-२० लक्ष,पारोडी-२० लक्ष,देसुर-२० लक्ष,शेकापुर- २० लक्ष, पांगुळगव्हाण- २० लक्ष,कानडी बु.-२० लक्ष,केळसांगवी- २० लक्ष,प्रिंप्रीघाटा- २० लक्ष,पोखरी- २० लक्ष,म्हसोबाचीवाडी- २० लक्ष,मांडवा- २० लक्ष, साबलखेड-२० लक्ष, शेडाळा- २० लक्ष,सांगवीपाटण- २० लक्ष,किन्ही- २५ लक्ष,खिळद- २५ लक्ष,दैठणा- २५ लक्ष,पिंपळगावघाट- २५ लक्ष,पिंप्री घुमरी- २५ लक्ष, पाटोदा तालुक्यातील निवडुंगा- २० लक्ष,बेदरवाडी- २० लक्ष,मांझरीघाट- २० लक्ष, निरगुडी- २० लक्ष, काकडहीरा- २० लक्ष, वाघिरा- २० लक्ष,येवलवाडी- २० लक्ष, गवळवाडी- २० लक्ष,सोनगाव सौंदाना २० लक्ष, सावरगाव सोने २० लक्ष,डोंगरकिन्ही २५ लक्ष,नाळवंडी २५ लक्ष, दासखेड २५ लक्ष शिरूर कासार तालुक्यातील माळेगाव चखला २० लक्ष, राळेसांगवी २० लक्ष, ब्रम्हनाथ येळंब २० लक्ष आष्टी, पाटोदा, शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील ३५ ग्रामपंचायतींना ७ कोटी ४० लक्ष रुपये निधी स्वतंत्र ग्रामपंचायत इमारतीसाठी मंजूर करून बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी मंजुरी करण्याच्या अपूर्व योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आ.पंकजाताई मुंडे यांचे माजीमंत्री सुरेश धस यांनी विशेष आभार व्यक्त केले आहेत.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ६ सप्टेंबर २०२४



## शेतकऱ्यांच्या बँक खात्यावरील होल्ड काढण्यात यावे नसता तिव्र आंदोलन- भाई विष्णुपंत घोलप



**पाटोदा :** बीड जिल्ह्यातील गेल्या वर्षीच्या पावसाच्या तुटीमुळे आणि काही वेळा सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके उध्वस्त झाली होती त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज गेल्या दोनवर्षापासून थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांचे बँक खाते होल्ड करण्यात आलेले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांना पिकविमा,पिक अनुदान व पी.एम.किसान निधी,ओम नमो सन्मान निधी,संजय गांधी निराधार निधी आणि इतर शासनाच्या योजनेचे आलेले पैसे मिळण्यास बँकेने होल्ड टाकल्यामुळे पैसे मिळण्यास अडचणी येत आहेत तरी मे.साहेबांनी राष्ट्रीयकृत बँकाने होल्ड केलेले खाते चालु करण्याचे संबंधीतांना आदेश द्यावेत,असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

## केज मतदारसंघात अतिवृष्टी होवून शेतकऱ्यांचे नुकसान सरसकट अनुदान व पीक विमा द्या-ॲड.शिवाजी कांबळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदारसंघातील सर्वच गावांमध्ये अतिवृष्टी होवून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाईचे अनुदान व पीक विमा द्यावा अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेशसचिव ऍड.शिवाजी कांबळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत गुरूवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



समाजवादी पार्टीचे प्रदेशसचिव ऍड.शिवाजी कांबळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना गुरूवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, केज विधानसभा मतदारसंघातील अंबाजोगाई, केज, नेकनूर या भागात अती पाऊस होवून शेतकऱ्यांचे फार नुकसान झालेले असून शेतकरी ऑनलाईन तक्रारी करू शकत नाही. तसेच पंचनामा करण्यात वेळ जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा पिक विमा भरणा केलेल्या कंपनीने ऑनलाईन तक्रार बंधनकारक करू नये. गावात मंडळ अधिकारी, कृषी सेवकांनी केलेले पंचनामे गृहीत धरून सरकारने शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाईचे अनुदान जाहीर करावे आणि पिक वीमा कंपनीने शासकीय यंत्रणामार्फत केलेले सदरचे पंचनामे गृहीत धरून पिक विमा मंजुर करावा अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार अबू अझमी साहेब यांचे नेतृत्वाखाली अंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून दिला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, राजेश परदेशी, ऍड.डी.एल.केंद्रे, शेख जिलानी शेख महेबूब आणि शेख शौकतभाई आदींसह समाजवादी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पंचनामे गृहीत धरून पिक विमा मंजुर करा

शेतकरी ऑनलाईन तक्रारी करू शकत नाही. तसेच पंचनामा करण्यात वेळ जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा पिक विमा भरणा केलेल्या कंपनीने ऑनलाईन तक्रार बंधनकारक करू नये. गावात मंडळ अधिकारी, कृषी सेवकांनी केलेले पंचनामे गृहीत धरून सरकारने शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाईचे अनुदान जाहीर करावे आणि पिक विमा कंपनीने शासकीय यंत्रणांनी केलेले सदरचे पंचनामे गृहीत धरून पिक विमा मंजुर करावा अशी मागणी आम्ही करीत आहोत.

– ऍड.शिवाजी कांबळे
(प्रदेशसचिव, समाजवादी पार्टी.)

## युवक तालुकाध्यक्ष पदी सुरेश गायकवाड व परमेश्वर खंडागळे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची माजलगाव पदाधिकारी निवड बैठक मराठवाडा संघटक राजाभाऊ खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली व युवक जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे,जिल्हा उपाध्यक्ष विष्णू अवचार,वडवणी तालुकाध्यक्ष विलास कारके यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडली. यात तालुक्यातील महत्त्वाच्या पदांच्या निवडी करण्यात आल्या.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया ने माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये जोर पकडला असून याच अनुषंगाने आज शासकीय विश्रामगृह माजलगाव येथे डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची पदाधिकाऱ्यांची निवड बैठक संपन्न झाली.यामध्ये सुरेश गायकवाड व परमेश्वर खंडागळे यांची युवक तालुकाध्यक्ष माजलगाव पदी निवड करण्यात आली. त्याच बरोबर कृष्णा खंडागळे यांची तालुकाध्यक्ष विद्यार्थी आघाडी,विशाल खंडागळे तालुका उपाध्यक्ष युवक माजलगाव,लक्ष्मण आवड तालुका सचिव माजलगाव, संदिपान खंडागळे तालुका उपाध्यक्ष माजलगाव,विजयकुमार पारवे तालुका कार्याध्यक्ष धारूर,रामेश्वर काळे युवक तालुका उपाध्यक्ष धारूर,अरुण काळे युवक तालुका संघटक धारूर,सुभाष शेवाळे पंचायत समिती सर्कल अध्यक्ष किटी आडगाव,प्रवीण खंडागळे युवक तालुका उपाध्यक्ष माजलगाव,कैलास उदारे सर्कल सचिव किटी आडगाव पदी सर्वांच्या निवडी करण्यात आल्या. माजलगाव विधानसभा मतदार संघात डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया ची खूप मोठी ताकद असून या निवडीमुळे पक्षाला आणखीन बळ मिळाले आहे. निश्चितच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये डिपिआय निर्णायक भूमिका पार पाडणार.



नवनाथ कांबळे,डिपिआय युवक जिल्हाध्यक्ष बीड

## अतिवृष्टीमुळे केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्याला ५० हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करा –वसंत मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मध्ये खूप मोठ्या प्रमाणावर मराठवाडा विदर्भात दिनांक ३१ ऑगस्ट पासून ३ सप्टेंबर पर्यंत ढगफुटी अतिवृष्टी मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्याचे हाती आलेले सोयाबीन कापूस तूर मका व इतर सर्व पिकांचे नुकसान झाले असून जमिनीचेही अतोनात माती वाहून गेल्यामुळे बांध फुटल्यामुळे पूर आल्यामुळे नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांची जनावरे शेळ्या मेंढ्या कोंबड्या गाई म्हशी घरे जनावराची गोठे जनावराचे चारा,कडबा व इतर पशुखाद्य वाहून गेल्यामुळे सर्व बाजूने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. केंद्र व राज्य सरकारने एन डी आर एफ व एच डी आर एफ च्या नियमांना बगल देऊन तात्काळ पंचनामे करून प्रतिहेक्टरी शेतकऱ्यांना ५० हजार रुपयाची आर्थिक मदत देण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. अगोदरच शेतीमालाला महाराष्ट्रातील अकार्यक्षम त्रिमूर्ती व मोदी सरकार भाव देण्यात असमर्थ ठरलेले असून शेतकरी वेगवेगळ्या खत बी बियाणे कीटकनाशके शेती अवजारे व जीवनावश्यक वस्तूवर जीएसटी चा टॅक्स देऊन आर्थिक संकटाचा सामना करीत असतानाच निसर्गाने हाती आलेले पिकांचेअतिवृष्टीमुळे ढगफुटीमुळे मुसळधार पावसाने नुकसान केले आहे.अतिवृष्टीमुळे जनावरे कोंबड्या शेळ्या मेंढ्या गाई म्हशी पुरात वाहून गेल्या व मरण पावले आहेत त्यांचे पंचनामे करून नियमात बसून आर्थिक मदत करावी, इलेक्ट्रिक मोटर शेतीची अवजारे चे खूप मोठ्या प्रमाणात वाहून गेल्यामुळे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र मध्ये गुजरात मध्य प्रदेशच्या बोगस कंपन्यामार्फत बियाणे खते कीटकनाशके औषधी बोगस सतत शेतकऱ्याच्या माथे मारीत असल्यामुळे शेतकरी चारही बाजूने आर्थिक संकटात सापडले आहे . कृषी खाते झोपलेले आहे कारण कृषी खात्यातील सर्वांच जबाबदार अधिकारी कर्मचारी मंत्री कार्यालय यांना बोगस कंपन्या मार्फत टक्केवारी मिळत असल्यामुळे कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्याला शासनाची साथ नाही तर निसर्गाची साथ नाही तरी ही शेतकरी स्वतःच्या कष्टाने मेहनत करून उत्पन्न शेतीतून काढून राज्यातील व देशातील जनतेला अन्नधान्य भाजीपाला दूध व इतर सर्व शेतीतील साहित्य पुरवतो तरीही शासन याची दखल घेत नाही हे खरे शेतकऱ्याचे दुर्दैव आहे. मराठवाडा व विदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर ८० ते ८५ टक्के शेती ही सोयाबीन कापूस तूर मूग उडीद मका बाजरी पिवळा ही पिके घेतली जातात. अतिवृष्टी मुसळधार ढगफुटीमुळे हाती आलेले पिके वाया गेलेले असून सर्व बाजूने शासनाने नियमात बसून पंचनामे करून एनडीआरएफ व एसडीआरएफ च्या निकष च्या अटी न घालता प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत तात्काळ देण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत बहुमताने ठराव मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग करण्याची मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडेंनी केली.

## आष्टी शहरातील श्री दत्त गणेश मंडळ अध्यक्षपदी दीपक उंबरकर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील मानाचा रथ क्र.१ चा श्री दत्त गणेश मंडळाची नुकतीच आष्टी येथील विठ्ठल मंदिरात सुभाष काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार झाली. या बैठकीत सर्वांनुमते मंडळाच्या अध्यक्षपदी दिपक उंबरकर तर उपाध्यक्षपदी प्रसाद देशपांडे, सचिव संतोष शेटे,कोषाध्यक्ष केशव सहस्त्रबुद्धे यांची निवड करण्यात आली. आष्टीतील या मंडळाचे वैशिष्ट्य श्रींची मूर्ती देणारे दाते २०३१ पर्यंत बुक झालेले आहेत. मंडळाच्या स्थापनेला या वर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहेत.विर्सजन मिरवणूक चारचाकी बैलगाडीच्या रथामध्ये होते.हा रथ मंडळाचे कार्यकर्ते स्वतः ओढतात. १० दिवसांच्या कालावधीत विविध प्रकारचे समाजप्रबोधन करणारे उपक्रम राबविले जातात.यामध्ये मतदान जनजागृती,वृक्षारोपण, भजन, रांगोळी स्पर्धा व गावं जेवणाचा भंडारा असे कार्यक्रमांने श्रींचे पारंपरिक पद्धतीने विसर्जन केले जाते. यामध्ये बॅन्ड,भजन, पकवाज,टाळ ही वाद्य वाजवले जातात अशी माहिती मंडळाचे जेष्ठ सदस्य अनंतदेवा जोशी यांनी दिली. या बैठकीमध्ये मंडळाचे जेष्ठ सदस्य राजाभाऊ देशपांडे,नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,दत्तात्रय देशपांडे,सुधीर विडेकर, अनंतदेवा जोशी,धीरज देशपांडे,आशिष देशपांडे,मनोहर पोतदार,नितिन वैद्य,उदय जहागिरदार,रवींद्र देशपांडे,महेंद्र पोतदार, ॲड.श्रीकृष्ण देशपांडे, अनिरुद्ध धर्माधिकारी, संजय देशपांडे,अनिल चव्हाण,अंबरीश धर्माधिकारी,दत्तात्रय जोशी,कल्याण चव्हाण, गणेश जाधव,लक्ष्मण भवर,संजय देशपांडे, विजय सहस्त्रबुद्धे , प्रदिप सहस्त्रबुद्धे , डॉ.राजु दाणी, संदिप दाणी, सुनिल वैद्य,हरिश देशपांडे,प्रणव देशपांडे, गिरीश देशपांडे,शार्दुल जोशी,हर्षद देशपांडे, सचिन रानडे,मकरंद जोशी,संजय कुलकर्णी, दुर्गेश कुलकर्णी,महेश कुलकर्णी,प्रसाद वैद्य, अमोल योगे,सर्वेश वैद्य, गणेश ससाणे,संजय जोशी,शुभम जोशी, अविनाश कुलकर्णी, अनूज जोशी,सार्थक पोतदार,राहुल काटेकर, विवेक सहस्त्रबुद्धे, अभिषेक सहस्त्रबुद्धे , स्वप्निल कुलकर्णी,संदेश शेटे,आदेश शेटे,तन्मय देशपांडे,भूषण शेंडे, प्रा.योगेश देशपांडे,मंदार जोशी,नंदकुमार दाणी, सुबोध सहस्त्रबुद्धे,शेखर दाणी,नितेश देशपांडे, ऋषिकेश सहस्त्रबुद्धे , सुनिल क्षिरसागर,महेंद्र दूशी,राम पाठक,वैभव जहागिरदार,शुभम जाधव,मंगेश मुंगीकर, महेंद्र जोशी,सागर विडेकर,विजय कुलकर्णी,वैभव दुशी आदि उपस्थित होते.



पान ६ वरून...

### गेवराई तालुक्यातील पिकांचे

पाऊस पडला आहे. तालुक्यातील सर्वच मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली झाली आहे. सध्या अनेक गावांमधील शेतातील पिकांमधून पाणी वाहत आहे. तालुक्यातील सर्व महसूल मंडळात अतिवृष्टीचा खरिपाच्या पिकांना फटका बसल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. कपाशीची बोंडे पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांच्या हाती उत्पादनाची आशा मावळली आहे. तसेच काही शेतात जी काही पिके शिल्लक राहिली आहेत, त्यांच्यावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण संपूर्ण पिके उद्?ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे तालुक्यातील खरीप हंगामातील पीक वाया गेल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मयुरी मस्के-खेडकर यांनी केली आहे.

### लाडकी बहीण योजना

असून जनतेसमोर जणू आम्हीच ही योजना सुरु केलेली आहे व यात दुसऱ्या कुणाचे काडीची योगदान नसल्याचे चित्र उभा केले जात आहे.आताच काही दिवसांपूर्वी बीड येथे संपन्न झालेल्या राष्ट्रवादीच्या जनसंवाद यात्रा सभेत देखील अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना ही मीच सुरु केली व सगळं माझ्यामुळेच झालं अशी टिमकी वाजवताना सर्वांनी पाहिलं. परंतु असं काही नसून लाडकी बहीण योजनेचे खरे आणि सर्वोपरी हक्कदार माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब हे आहेत आणि जनतेला हे चांगलेच माहित आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्वत्र स्वतःच्या नावाचा बोलबाला करून घेत आहे. मुख्यमंत्री साहेबांचे नाव वगळून सध्या अजित दादा चे लाडके बहीण योजना आहे असे सांगून मिरवत आहेत. माझी लाडकी बहीण योजनेचे फुकटचे श्रेय लाटणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि त्यांच्या गटाला बीड जिल्हा शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी पत्रक काढत कडक विरोध दर्शविला आहे.

### कापसाच्या मर रोगावर

छेडण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सरचिटणीस सुहास पाटील, शेलेश सुरवसे, रामचंद्र बरडे, अच्युत सुरवसे, राम सपकाळ, सुधाकर काकडे, संजय तीपाले, रमेश जगताप, सुभाष सपकाळ, मोहन गव्हाणे, कृष्णा मसुरे आदीच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले

### २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना

मात्र त्यांना कसल्याच प्रकारचे विमा संरक्षण मिळाले नाही. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक विभाग, मशीन ऑपरेटर, कामगार, वृत्तपत्र वाटप करणारे मुले, श्रमिक कामगार काम करत असतात. एखाद्या दुर्घटनेत वृत्तपत्र कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबियांवर मोठे आर्थिक संकट ओढावते. यामुळे वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना अपघाती विमा संरक्षण देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला. बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत दि.१३ ऑगस्ट रोजी प्राथमिक स्वरुपात कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा काढण्यात आला. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात आतापर्यंत २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना ११ कोटींचे विमा कवच देऊन डॉ. क्षीरसागर यांनी कायम श्रमिक कर्मचाऱ्यांच्या पाठिशी असल्याने सिध्द केले आहे.

## महानुभाव पंथाकडून शासकीय कार्यालयांना श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमा वाटप.

किल्ले धारूर । प्रतिनिधी

सुमारे आठशे वर्षांपूर्वी श्री चक्रधर स्वामी यांनी अवतार घेतला त्यांचा ५ सप्टेंबर हा दिवस अवतार दिन म्हणून साजरा केला जातो महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त धारूर शहरातील सर्व शासकीय कार्यालय व शाळा महाविद्यालयांमध्ये महानुभाव पंथाच्या वतीने श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमांचे वाटप करण्यात आले.

राज्य शासनाच्या परिपत्रकात यंदा 'भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिना' चा जयंती कार्यक्रमामध्ये नव्याने समावेश केला आहे. या निर्णयाचे महानुभाव पंथ साठी मराठी सारस्वतानेही स्वागत केले आहे.त्या अनुषंगाने आज दिनांक ५ सप्टेंबर २०२४ महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिनानिमित्त शासकीय कार्यालय ,धारूर शहरातील शाळांमध्ये तसेच महाविद्यालय येथे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी ची प्रतिमा सप्रेम भेट म्हणून देण्यात आली व श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दीन साजरा करण्यात आला यावेळी महानुभाव पंथीय ग्रामस्थ आणि गावातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते याप्रसंगी विद्यार्थ्यांना महानुभाव पंथा विषयी माहिती देण्यात आली व प्रभु चक्रधर स्वामी यांचे महित्म सांगितले . या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये श्री चक्रधर स्वामी यांचे प्रतिमा वाटून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महानुभाव पंथाचे अनुयायी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात शिक्षकदिन सोहळा संपन्न

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपति डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात शिक्षक दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे व प्रमुख वक्ते डॉ विनोद जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केल्यानंतर विद्यार्थिनींनी महाविद्यालयातील गुरुजनांचे पुष्प देऊन स्वागत केले. यानंतर नेतल शर्मा, अनन्या कदम, वैष्णवी काबरा, ऐश्वर्या पोटभरे, गंगासागर केंद्रे आदि विद्यार्थिनीनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्ते प्रा डॉ जगतकर यांनी सांगितले की, हिटलर सारखा नेता सुद्धा ज्याच्या चरणी नतमस्तक होतो तो शिक्षक होय, आई ही खरी शिक्षक, मतिमंदाला सुद्धा शास्त्रज्ञ बनवितो तो शिक्षक असे प्रेरणादायी विचार अनेक उदाहरणांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात प्रा प्रसाद देशमुख यांनी कर्तव्याची नि:स्पृह निर्वहन करणारी पिढी शिक्षकच घडवत असतो असे सांगून संत कबिरांच्या वचनाच्या आधारे शिक्षकांचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी गौरी पुजारी हिने आपल्या प्रास्तविकात – शिक्षक हा राष्ट्राचा प्राण आहे. गुरु गोविंद जर एकत्र आले तर मी प्रथम प्रणाम हा श्रीगुरुंनाच करेन असे संत कबीर महाराजांच्या दोह्याच्या आधारे सांगितले. सूत्रसंचालन संध्या सातपुते हीने केले तर अश्विनी देशमुख हिने आभार प्रकटन केले या सोहळ्यासाठी महाविद्या लयातील शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.



## कडा येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे आदर्श शिक्षक व उपक्रमशील शाळा पुरस्कार जाहिर -चेअरमन मारुती पठाडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिक्षकांची कामधेनु आणि प्रगतशील व नावलौकिक असलेली कडा येथील स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेचे सन २०२४- २०२५ चे आदर्श शिक्षक व उपक्रमशील शाळा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत अशी माहिती चेअरमन मारुती पठाडे,व्हाईस चेअरमन अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे व संचालक मंडळाने प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे. प्रतिवर्षाप्रमाणे शैक्षणिक,सामाजिक, क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणा-या शिक्षकांना स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेतर्फे '' आदर्श शिक्षक '' निवड करून त्यांचा संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सत्कार करण्यात येत असतो.शाळेमध्ये विविध उपक्रम राबवणाऱ्या उपक्रमशील शाळांची निवड प्रतिवर्षी करण्यात येते.त्या शाळेंचाही सत्कार समारंभ संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात येत असतो. त्यानुसार सन २०२४- २०२५ साठीचे आदर्श शिक्षक पुरस्कार व उपक्रमशील शाळांची नावे पुढीलप्रमाणे....



मच्छिंद्र जगताप ( हरिनारायण आष्टा), एकनाथ खांडवी (सुलेमान देवळा), बाबासाहेब लोंढे (हिंगणी),महेश पर्वतकर (कुंभेफळ),अनंता शिरसवाल (भाळवणी), नंदकुमार अस्वर (सराटेवडगांव),शिवाजी गोंदकर (शेरी खुर्द), नामदेव बोडखे ( खिळद),राजु मोरे (साबलखेड), उत्तम माळी (बांदखेल),श्रीमती उर्मिला वराट (चिंचपूर), दत्तात्रय गुरसाळे (महाजनवाडी),संजु वाडगे (जाटनांदुर), रावसाहेब घुले (कारखेल),बाळासाहेब पुंडे (वेलतुरी),रामदास दहिफळे (वनवेवाडी), प्रकाश पिंपरे (शेरीफाटा शिराळ),श्रीमती सुलताना शेख नय्यर ( आष्टी नं.२),संपत आमटे (रुईनालकोल टाकळी अमिया),श्रीमती मनिषा शेवंते (कडा), महेश वाटाडे (कोल्हेवाडी)'

अशोक गांगर्डे (पोकळेवस्ती लोणी), सय्यद आरिफ (गुंडेवाडी),रामदास सोले (आंधळेवाडी),श्रीमती संजीवनी कोकणे ( पुंडी) यांचा समावेश आहे.

विशेष आदर्श शिक्षक पुरस्कार

अशोक झगडे ( प्रा.शा. झोपडपट्टी चोभानिमगाव), उपक्रमशिल शाळा.इयत्ता पहिली ते पाचवी - जि.प.प्राथमिक शाळा वाळकेवस्ती लोणी), जि.प.प्राथमिक शाळा दैठणा (केंद्र पारगाव जोगेश्वरी),इयत्ता पहिली ते सातवी - जि.प. प्राथमिक शाळा महिंदा (केंद्र पाटसरा) यांची निवड करण्यात आलेली आहे.

## भाजप आमदार निलेश राणेवर कायदेशीर कारवाई करावी

पाटोदा । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासून भाजपा आमदार निलेश राणे मुस्लिम समाजाला टार्गेट करून भडकावून विधाने करत आहेत जे की समाज विघातक , धार्मिक तेढ निर्माण करणारे , सामाजिक सलोखा बिघडवणारे , द्वोषपूर्ण , भडकाऊ , अशांतता निर्माण करणारे आणि महाविकास युती सरकार पुरस्कृत आहे असे वाटू लागले आहे . एखादा कोणीतरी हिंदू धर्माचा ठेका घेतलेला साधू , संधी साधू परधर्मीयाच्या पैगंबर साहेबा विरोधात काहीही कारण नसताना चुकीचे निंदनीय व भावना ' भडकावणारे बोलतो . संबंधित महाराजावर कारवाई तर झालीच नाही , त्यात भर म्हणून निलेश राणे यांचे प्रार्थनास्थळात घुसून मारू हे विधान अजून चिड निर्माण करणारे वक्तव्य . खरं पाहिले तर धर्म सांगणाऱ्या संतांचा उद्देश प्रत्येक माणसांमध्ये विवेक निर्माण करण्याचे आहे व मानव कल्याण आहे . परंतु ते दुर्दैवाने होत नाही यात भरीव राज्य सरकार व त्यांच्या अंकुश राहिलेला नाही किंवा जाणीवपूर्वक सर्व गोष्टी राज्य सरकार प्रमोटेड असतील असे वाटू लागले आहे . त्यामुळे राज्यपाल या नात्याने याला प्रतिबंध करण्यासाठी आपण योग्य ती पावले उचलावीत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष तालुका पाटोदा चे भुषण जाधव यांनी तहसिल कार्यालय मार्फत राज्यपालांना केली आहे.

cmyk

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांचा मदत निधी बंद केला नाही





## सरकारचे स्पष्टीकरण

मुंबई । प्रतिनिधी

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांचा मदत निधी बंदच्या वृत्ताचे खंडण राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत करण्यात आले. गुरूवारी (दि.५) झालेल्या बैठकीत पुणे–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्यासह विविध महत्वाच्या १० हून अधिक निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेचा आढावा घेतला.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि सरकारमधील इतर कॅबिनेट मंत्री उपस्थित होते. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ब्राँकायटिसची लागण झाल्याने ते ऑनलाईन हजर होते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांचा मदत निधी बंदच्या वृत्ताने सरकारवर सकाळपासून टीकेची झोड उठली होती. तर याबाबत महसूल व वन विभागाने मंगळवारी शासन निर्णय काढला होता. ज्यात राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांच्या मदतीसाठी उणे प्राधिकार पत्रावरील तातडीच्या निधीची मान्यता बंद करण्यात आल्याचे म्हटले होते. ज्यानंतर नव्या वादाला तोंड फुटले होते. यावरून बैठकीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांचा मदत निधी बंदच्या वृत्ताचे सरकारने खंडन केले. तसेच ही योजना सुरूच राहणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. यावेळी यांनी लाडकी बहीण योजनेचा आढावा घेण्यात आला. ज्यात आतापर्यंत राज्यभरात १.६० लाख लाभार्थी महिलांना ४ हजार ७८७ कोटी रूपयांचे वाटप करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

# घरगुती उपायाने वाढवा जनावरांमध्ये दुधाचे प्रमाण



जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढवायची असेल, तर हा घरगुती उपाय तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. यासाठी तुम्हाला जास्त पैसे खर्च करण्याची आणि मेहनत करण्याचीही गरज नाही. आजच्या काळात गायी–म्हशींचे अधिकाधिक दूध घेण्यासाठी पशुपालक वेगवेगळ्या लसी किंवा इतर पद्धतींची मदत घेतात. या उपायांनी सुरुवातीला परिणाम दिसत असले तरी काहीवेळा त्याचा जनावरांवर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पण तुम्हाला माहीत आहे का की विविध घरगुती उपायांचा अवलंब करून पशुपालक गायी आणि म्हशींपासून अधिक दूध मिळवू शकतात.

**गायी आणि म्हशींमध्ये दुधाचे प्रमाण वाढवण्याचे उपाय**

गायी म्हशींमध्ये दूध वाढवण्याच्या पद्धतीसाठी काही साहित्यांची आवश्यकता असेल. ते साहित्य असे काही आहे. २५० ग्रॅम गहू दलिया, १०० ग्रॅम गुळाचे सरबत (आवटी), ५० ग्रॅम मेथी, कच्चा नारळ, २५–२५ ग्रॅम जिरे आणि ओवा इ. प्रथम दलिया, मेथी आणि गूळ शिजवून घ्या, नंतर नारळ बारीक करून घाला. ते थंड झाल्यावर जनावरांना खायला द्यावे. हे घटक फक्त सकाळी रिकाम्या पोटी २ महिने खायला द्या. वासरांना जन्म देण्याच्या एक महिना आधी आणि व्यायल्यानंतर एक महिन्यापर्यंत गायीला द्यायला सुरुवात करा. प्रत्येकी २५ ग्रॅम जीरा आणि ओवा व्यायल्यानंतर फक्त ३ दिवस गायींना द्या. खूप चांगले परिणाम मिळू शकतात. व्यायल्यानंतर २१ दिवस गायीला सामान्य आहार द्या. गायीचे वासरू ३ महिन्यांचे झाल्यावर किंवा गायीचे दूध कमी झाल्यावर गायीला ३० ग्रॅम/दिवस जवस औषध म्हणून द्यावे, दूध कमी होणार नाही.

**गाई आणि म्हशींसाठी औषध :**

२०० ते ३०० ग्रॅम मोहरीचे तेल, २५० ग्रॅम गव्हाचे पीठ, दोन्ही एकत्र करून संध्याकाळी जनावरांना चारा–पाणी झाल्यावर खायला द्यावे. लक्षात ठेवा यानंतर पाणी देऊ नये आणि हे औषधही पाण्यासोबत देऊ नये. अन्यथा जनावराला खोकल्याचा त्रास होऊ शकतो. जनावरांना दिलेला हिरवा चारा, सरकी इत्यादी खाद्य चालू ठेवावे लागते. ७–८ दिवस आहार द्या आणि नंतर औषध बंद करा.

# एकात्मिक भातशेती आणि मत्स्यपालन केल्याने होतात हे फायदे



एकात्मिक भात–मत्स्यपालन पद्धती ज्याला भात शेतीतील मासेपालन म्हणूनही ओळखले जाते, ही एक जुनी पद्धती आहे ज्यामध्ये मत्स्यपालन आणि भातशेती एकत्र करतात. कृषी उत्पादकता आणि शाश्वतता वाढविण्याच्या क्षमतेमुळे या पद्धतीला महत्व प्राप्त झाले आहे.

**एकात्मिक भात – मत्स्य पालनाचे फायदे :**

एकात्मिक भात – मत्स्यपालन पद्धती द्वारे भाताचे उत्पन्न वाढते. माशांच्या मलमुत्रात नायट्रोजन आणि फॉस्फरस सारखे आवश्यक पोषक तत्त्वे प्रदान करतात, ज्यामुळे तांदूळ पिकाची चांगली वाढ होते. भात शेतीतील माशांच्या हालचालीमुळे माती हवेशीर होऊन तणांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. ज्यामुळे भात पिकाची चांगली वाढ होऊन उत्पादन सुद्धा वाढते. एका अभ्यासानुसार एकात्मिक भात मत्स्यपालन पद्धतीमुळे भाताचे उत्पादन १५ ते २० टक्क्यांनी वाढते. भात खाचरामध्ये मत्स्यशेती केल्याने जमिनीची सुपीकता लक्षणीयरीत्या सुधारते. माशांचा कचरा नैसर्गिक खत म्हणून काम करते जे मातीला सेंद्रिय पदार्थ आणि पोषक तत्वांनी समृद्ध करते. यामुळे रासायनिक खते कमी प्रमाणात लागतात. शाश्वत शेती पद्धतींना चालना मिळते. एकात्मिक भात मत्स्य शेतीमुळे मातीतील सेंद्रिय कार्बन आणि सूक्ष्मजीव यांचे प्रमाण वाढते ज्यामुळे मातीचे आरोग्य सुधारते. एकात्मिक भात मत्स्यशेती कीड व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भात खाचरातील मासे कीटक आणि त्यांच्या अळ्यांचे शिकार करतात, ज्यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते. ही नैसर्गिक कीड नियंत्रण पद्धत केवळ पर्यावरणाचा समतोल राखण्यातच मदत करत नाही तर शेतकऱ्यांसाठी कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी करते. अभ्यासानुसार एकात्मिक भात मत्स्य शेतीमुळे खोड पोखरणारी अळी, तुडतुडे, पाने गुंडाळणाऱ्या अळीच्या संख्येत लक्षणीय घट होत असल्याचे सिद्ध झाले आहे.

# उडीदाचे भाव ११ हजार पार



**बाजारात उडीदला वर्षभर चांगली मागणी होती. मागील काही महिन्यापासून उडीदला चांगला भाव मिळत होता. परंतु बाजारात विकायला शेतकऱ्यांकडे उडीद उपलब्ध नव्हता. आता बाजारात नवीन उडीद आल्यामुळे बाजारभाव वाढलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.**

महाराष्ट्रात उडीदला सरासरी भाव ८१४६.५७ रू., कमीतकमी ६५०० रू. आणि जास्तीत जास्त ११४०० रू. प्रति क्विंटल असा भाव मिळात आहे. गुरूवारी पुणे बाजार समितीत उडीदला सर्वाधिक ११४०० रू. प्रति क्विंटल असा भाव मिळाला असून कमीतकमी १०,००० रू. आणि सर्वसामान्य १०, ७०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळालेला आहे. सांगली येथे उडीदला कमीतकमी ७५०० रू., जास्तीत जास्त ९५०० रू. आणि सरासरी ८५०० रू. प्रति क्विंटल दर मिळालेला आहे. लातूर बाजार समितीत ३१३६ क्विंटल आवक झाली असून कमीतकमी ७५०१ रू., जास्तीत जास्त ८५३० रू. आणि सरासरी ८००० रू. प्रति क्विंटल दर मिळालेला आहे. मुंबई बाजार समितीत १३६ क्विंटल आवक झाली असून कमीतकमी ९५०० रू., जास्तीत जास्त ११००० रू. आणि सरासरी १०३०० रू. प्रति क्विंटल दर मिळालेला आहे. बीड बाजार समितीत ५८ क्विंटल आवक झाली असून कमीतकमी ७००१ रू., जास्तीत जास्त ८००० रू. आणि सरासरी ७५८० रू. प्रति क्विंटल दर मिळालेला आहे. उडीदला सर्वात कमी बाजारभाव शेवगाव येथे ५५०० रू. प्रति क्विंटल असा दर मिळालेला आहे. एकूणच उडीदाने ११ हजारी पार केली आहे.

# हळद पिकावरील किडी आणि रोगाचे व्यवस्थापन

**सध्याच्या वातावरणामध्ये हळदीवर कंदमाशी या किडीचा आणि पानावरील ठिपके, करपा व कंदकूज सारख्या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. यासाठी पिकाचे कसे नियोजन करावे याबाबत माहिती असने गरजेचे आहे.**

**कंदमाशी :**

उघड्या पडलेल्या कंदाजवळ कंदमाशीची मादी अंडी घालते त्यामुळे हे कंद मातीने वेळोवेळी झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक १५ दिवसांच्या अंतराने क्विनॉलफॉस २५% प्रवाही– ४०० मिली (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट ३०% प्रवाही– ३०० मि. ली. (१५ मिली प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका कीटकनाशकाची प्रति एकर या प्रमाणे झाडावर आलटून पालटून फवारणी करावी. फवारणी करताना द्रावणात चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळावे. जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के १ लिटर (५० मिलि प्रति १० लिटर पाण्यात) घेऊन प्रति एकरी या प्रमाणात आळवणी करावी. याच पद्धतीने कीटकनाशकाची आळवणी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात निश्चित करावी.



**पानावरील ठिपके आणि करपा रोग :** करपाजन्य रोगग्रस्त पाने वेळोवेळी जमा करून जाळून नष्ट करावीत आणि शेतात स्वच्छता राखावी. प्रादुर्भाव कमी असल्यास कार्बेडेंझीम ५० टक्के ४०० ग्रॅम (२० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५० टक्के ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त असल्यास एजोक्सिस्ट्रोबीन १८.२ टक्के + डायफेनोकोनॅझोल ११.४ टक्के (पूर्वमिश्रित बुरशीनाशक) २०० मिली (१० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा प्रोपीकोनॅझोल २५ टक्के २०० मिली (१० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा क्लोरथॅलोनील ७५ टक्के ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी.

**कंदकूज रोग :**

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकरी २ ते २.५ किलो ट्रायकोडर्मा शेणखतामध्ये मिसळून जमिनीतून द्यावे. जास्त पावसामुळे शेतात साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा वेळोवेळी निचरा करावा. जेणेकरून कंदकूज होण्यास कारणीभूत असलेल्या बुरशीचा प्रसार कमी करता येईल. कंदकूज झाली असल्यास जमिनीतून कार्बेडेंझीम ५०% –२०० ग्रॅम (१० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के –६०० ग्रॅम (३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५० टक्के –१००० ग्रॅम (५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकरी या प्रमाणात दरवेळी महिन्यातून एकदा आळवणी करावी. (आळवणी करताना जमिनीमध्ये वापसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकास पाण्याचा थोडा ताण द्यावा.)

**महत्त्वाची सूचना :**

कुठलीही फवारणी करताना पावसाचा अंदाज घेऊनच फवारणी करावी. वरील कीटकनाशका सोबत कुठल्याही प्रकारचे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते, सूक्ष्म मुलद्रव्ये अथवा रसायने मिसळू नये. लागोपाठ एकच एक कीटकनाशक फवारू नये आलटून पालटून वापरावे. फवारणी करता दूषित पाणी न वापरता स्वच्छ पाणी वापरावे आणि पाण्याचे प्रमाण शिफारसीतच वापरावे, कमी पाणी वापरल्यास फवारणीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. कीडनाशक फवारणी करताना योग्य ती संरक्षक विषयी काळजी घ्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२२ : फर्डिनांड मॅगेलनच्या मोहिमेतील व्हिक्टोरिया हे जगप्रदक्षिणा करणारे पहिले जहाज स्पेनला पोहोचले.

१८८८ : चार्ल्स टर्नरचा एकाच मोसमात २५० क्रिकेट बळीचा विक्रम.

१९३९ : दुसरे महायुद्ध दक्षिण अफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

१९५२ : कॅनडातील पहिले दूरचित्रवाणी केन्द्र मॉंट्रिअल येथे सुरू झाले.

१९६५ : पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयुब खान यांनी भारताविरुद्ध युद्ध पुकारले. 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम' ही त्यांची दिल्लीपर्यंत धडक मारण्याची योजना होती. पॅटन रणगाडे आणि सेबरजेट विमाने असलेल्या पाकिस्तानच्या घुसखोरीला प्रत्युत्तर देत भारताने पाकिस्तानवर हल्ला चढवला व पहिल्या भारत पाकिस्तान युद्धाची सुरूवात झाली. या युद्धात भारताने पाकिस्तानला सपाटून मार दिला.

१९६६ : दक्षिण अफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हरवोअर्ड यांची संसदीय बैठक चालू असतानाच भोसकुन हत्या.

१९६८ : स्वाझीलँड हा देश स्वतंत्र झाला.

१९९३ : ज्येष्ठ कवी गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड

१९९७ : अमेरिकेतील 'नॅशनल एन्डाऊमेंट फॉर द आर्टस' या संस्थेतर्फे विख्यात सरोदवादक अमजद अली खाँ यांची 'नॅशनल हेरिटेजफेलोशिप'साठी निवड

२००८ : डी. सुब्बाराव यांची भारतीय रिजर्व बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ६ सप्टेबर पासून आपला पदभार सांभाळला.

२०१९ : भारतीय क्रिकेटपटू ऋषभ पंत कसोटी क्रिकेट सामन्यात सर्वात पहिले ५० गाडी बाद करण्याचा विक्रम आपल्या नावे करणरे पहिले यष्टीरक्षक बनले.

२०१९ : आपत्ती व्यवस्थापनेबद्दल आयोजित ‘‘ एक्सिलेंस अवार्ड’’ ओडिसा राज्याने जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६६ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २७ जुलै १८४४)

१८८९ : बॅ. शरदचंद्र बोस स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (मृत्यू: २० फेब्रुवारी १९५०)

१८९२ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ सर एडवर्ड ऍपलटन यांचा जन्म.

१९०१ : कमलाबाई कामत तथा कमलाबाई रघुनाथ गोखले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार. 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मूकपटात त्यांनी भूमिका केली होती. त्यांचे चिरंजीव चंद्रकांत गोखले व नातू विक्रम गोखले अशा तीन पिढ्यांनी अभिनय क्षेत्र गाजवले. (मृत्यू: १८ मे १९९७)

१९२१ : बार–कोड चे सहसंशोधक नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर २०१२)

१९२३ : युगोस्लाव्हियाचे राजा पीटर (दुसरा) यांचा जन्म.

१९२९ : यश जोहर हिन्दी चित्रपट निर्माता (मृत्यू: २६ जून २००४)

१९५७ : पोर्तुगालचे पंतप्रधान जोशे सॉक्रेटिस यांचा जन्म.

१९६८ : सईद अन्वर पाकिस्तानी डावखुरा फलंदाज व कप्तान. आपल्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात तो दोन्ही डावांत शून्य धावांवर बाद झाला होता. आपल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यातही त्याने केवळ ३ धावा केल्या होत्या. मात्र नंतर त्याची कामगिरी एकदमच बहारदार झाली. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांत सलग तीन शतके झळकावणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये त्याचा समावेश होतो.

१९७१ : भारतीय क्रिकेट खेळाडू देवांग गांधी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०७ : नोबल पारितोषिक विजेता प्रख्यात फ्रेंच कवी आणि निबंधलेखक सुल्ली प्रुडहोमी यांचे निधन.

१९३८ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक सली प्रुडहॉम यांचे निधन.

१९६३ : मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कोंकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, ऊर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (जन्म: २३ मार्च १८८३)

१९७२ : अल्लाउद्दीन खाँ सरोदवादक व संगीतकार. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातील महर्षितुल्य कलाकार व संगीतकार. सरोद, व्हायोलिन, बासरी व अन्य अनेक वाद्ये ते तयारीने वाजवत असत. मैहर राजघराण्याचे दरबारी वादक. संगीत नाटक अकादमी पारितोषिक (१९५४), पद्मभूषण (१९५८), पद्मविभूषण (१९७१) इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. (जन्म: ? ? १८६२)

१९८६ : सुरेश हरिप्रसाद जोशी आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी, कथाकार व समीक्षक. त्यांनी काही भारतीय व परकीय साहित्यकृतींचे गुजराथीत अनुवादही केले. (जन्म: ३० मे १९२१)

१९९० : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६)

२००७ : इटालियन ऑपेरा गायक लुसियानो पाव्हारॉटी यांचे निधन.

२००९ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंजाब राज्याचे माजी तेरावे मुख्यमंत्री हरचरण सिंह ब्रार यांचे निधन.

# वयोवृद्ध आजी-आजोबांवर पोस्ट ऑफिस अधिकाऱ्यांचा अत्याचार!

## आजी आजोबाचा नातू जनसेवक गणेश कवडे धावला मदतीला!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अनेक वय वृद्ध आजी-आजोबांचे पगार पोस्टातील मगरूर अधिकाऱ्यामुळे अडकले होते दहा पंधरा दिवसापासून आजी आजोबा या पोस्टमध्ये चकरा मारत होते एक अजि तर चक्क चक्कर येऊनच पडली तरी देखील अधिकाऱ्यांना काही फरक पडला नाही हे सर्व प्रकार जनसेवक गणेश कवडे यांच्या कानावर आल्यानंतर त्यांनी लागलीच संबंधितांना भेट घेऊन त्यांचे प्रश्न थेट खासदारांच्या कानावर घातले आणि खासदारांशी सर्वसामान्य जनतेचे बोलणं करून दिल खासदारांनी सकारात्मक भूमिका घेऊन अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना दिल्या तर गणेश कवडे यांना त्या सर्वांचे पैसे मिळवून द्या असे आदेश देखील दिले.

आपल्या हक्काचे पगार मिळण्यासाठी अनेक दिवसापासून चक्र मारत असलेले आजी आजोबा आणि त्यांचे प्रश्न घेऊन जनसेवक गणेश कवडे तहसीलदाराच्या दारात गेले आणि जाब विचारला असता तहसीलदारांनी सर्वांचे पैसे आठ तारखेला तहसील मधून वर्ग झाले आहेत असं कळवलं मग पोस्टातील मगरूळ अधिकारीच सर्वसामान्यांना त्रास देतात का ? असा प्रश्न उपस्थित होतो. अशी माहिती कळताच गणेश कवडे यांनी सर्व आजी-आजोबांना अस्वस्थ केले आणि तुमचा पगार पोस्टात येऊन मी तुमचे खात्यावर टाकून घेतो असं सांगितले यावेळी जनसेवक गणेश कवडे व सामाजिक कार्यकर्ते चक्रपाणी जाधव यांच्यासह पाटोदा तालुक्यातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



### सर्व वयोवृद्ध आजी-आजोबांना घेऊन गणेश कवडे तहसीलच्या दारात

वयोवृद्ध आजी-आजोबांचे पगार जाणून बुजून पोस्ट अधिकारी मगरुरपणा दाखवत चालढकल करत होता येणारे वयोवृद्ध नागरिक त्या मगरूर अधिकाऱ्या वैतागले होते सर्व आजी-आजोबांनी गणेश कवडे यांची भेट घेऊन हा विषय कानावर घातला लागलीच कवडे यांनी सर्वांना घेऊन तहसील कडे धाव घेतली आणि प्रशासनाला जाब विचारले प्रशासनाने सांगितले सर्व पैसे वर्ग केले आहेत पैसे भेटून जातील संबंधित अधिकाऱ्याला सूचना दिले असल्याचे देखील प्रशासनाकडून कळालं आहे.

### खासदार बजरंग सोनवणे यांनी फोनवरून लोकांच्या तक्रारी घेतल्या जाणून

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाटोदा येथील वय वृद्ध आजी आजोबांच्या तक्रारी फोनवरून जाणून घेतल्या. पाटोदा येथे अनेक वय वृद्ध आजी-आजोबांच्या पोस्ट ऑफिस अधिकाऱ्याकडून होत असलेल्या हेडसाळेची तक्रार जनसेवक गणेश कवडे यांच्या कानावर आली आणि त्या क्षणी खासदार साहेबांना फोन करून आजी-आजोबांशी थेट खासदारांचे बोलणं करून दिलं आणि हा प्रश्न मार्गी लावू काळजी करू नका असा विश्वास खासदार साहेबांनी दिला.

## साहित्य निकेतन ग्रंथालयाचा गीत गोपाल संगीत कार्यक्रम बहरला




अंबाजोगाई । प्रतिनिधी

साहित्य निकेतन ग्रंथालयाच्या पुढाकाराने श्रीकृष्ण चरित्रातील निवडक गाण्यांचे गीत गोपालच्या माध्यमातून नुकतेच सादरीकरण झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहासकार डॉ.शरद हेबाळकर होते. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,आ.नमिता मुंदडा, रामचंद्र झंवर,दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की,जिल्हा ग्रंथालयाधिकारी संजय मस्के, सर्वेश बजाज, पवन गिरवलकर संजय शेट्ये ,राष्ट्रसेविका समितीच्या पदाधिकारी शरयु हेबाळकर, वसुंधरा बँकेच्या अध्यक्षा सुनंदा मुंदडा आदी उपस्थित होते. गीत गोपालच्या माध्यमातून वैभव पांडे, वर्षा जोशी,सारीका पांडे यांचे गायन तर संवादिनीवर शांतीभूषण देशपांडे, पखवाज गजानन धुमाळ, चेतन पांडे तबला ,सारंग भोळे, बासरी ,श्रीकांत उमरीकर बोलवाद्य, ललित चोबे इतर तालवाद्य आदींच्या सहकार्याने रसाळ कृष्ण कथा गायन सुमधुर आवाजात सादर झाले यावेळी ग्रंथालयाचे मुख्य व्यवस्थापक कांतीलाल बेंडसुरे यांना ग्रंथालय चळवळीत केलेल्या कार्याबद्दल मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले. तसेच ग्रंथालयांना पुस्तके वाटप करण्यात आली. प्रास्तविक ग्रंथालयाचे अध्यक्ष दत्तप्रसाद रांदड यांनी केले संचालन कौस्तुभ कोदरकर यांनी तर आभार दत्तप्रसाद गोस्वामी यांनी मानले.

## डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नागापूर खुर्द, मोरगाव येथील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतीची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.५) बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दिल्या.



नागापूर खुर्द, मोरगाव यासह बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे. मोरगाव येथील जाधव वस्ती परिसरात शिवाजी येडे, लाला पाटील चौरे, महादेव खोसे, बालासाहेब जाधव, अच्युत रसाळ, चव्हाण, वैजनाथ जाधव, रामराव जाधव, समीर शेख, शहादेव खोसे, भारत जाधव, सर्जेराव जाधव, अतुल जाधव, नंदू जायभाये, बाळू धोंगडे, सुनील कागदे, विष्णू मेंगडे, नितीन चौरे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. तसेच, नागापूर खुर्द येथे पाहणीदरम्यान हनुमान साळुंके, श्वर्मा साळुंके, वसंत साळुंके, हनुमान लव्हाळे, राहुल साळुंके, दत्ता साळुंके, गोकुळ साळुंके, सतीश साळुंके, मसुराम सोळुंके, राहुल साळुंके यांच्यासह शेतकरी, नागरिकांची उपस्थिती होती.

## परळीतील दोन विद्यार्थ्यांचा प्रा. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते सत्कार



परळी । प्रतिनिधी

दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी परळीतील सामाजिक कार्यकर्ते प्रा.विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी वैद्यकिय महाविद्यालयात प्रवेश मिळविल्याबद्दल दोन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री विलास आदोड यांची मुलगी कु.अनिशा हिने एस.सी. कॅटेगिरी मधून मेडिकल साठी प्रवेश मिळवित तिने या परीक्षेत ५७२ गुण घेतले असून तिला एस.आर.टी.मेडिकल कॉलेज अंबाजोगाई येथे प्रवेश मिळविला आहे. तर श्रीमती कृष्णाबाई देशमुख शाळेतील शिक्षक श्री अमोल भानुदास गुढे सर यांच्या रितेश अमोल गुढे या मुलाने ओपन मधूनच मेडिकलला प्रवेश मिळविला आहे. त्याचाही यावेळी सत्कार करण्यात आला. श्री माणिकभाऊ मुंडे यांच्या हस्ते त्याचाही सत्कार करण्यात आला. तर कु.अनिशाचा सौ.आशा विजयकुमार देशमुख यांनी सत्कार केला. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात श्री रेपे साहेब, श्री. जे.टी.महाजन सर, श्री विलासराव आदोडे, श्री आटोळकर, श्री प्रकाश शिंदे श्री अशोक शिंदे, श्री महादेव हुंडेकर श्री आर.एम.कांबळे, श्री राहुल जगतकर, श्री राहुल ताटे आदी उपस्थित होते.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तात्काळ उपाययोजना करा - गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी) कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी दि.०३/०९/२०२४ पासुन सुरु असलेल्या आंदोलनास भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रणित इंटक कामगार संघटनेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी बोलताना काँग्रेस पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे म्हणाले की, १०/१२ तास काम करून देखील एसटी कर्मचार्यांना राज्य शासकीय कर्मचारी यांच्याप्रमाणे वेतन वाढ मिळत नाही, महागाई भत्ता फरक बिल मिळात नाही. एकीकडे रोज नवनवीन योजना काढून सरकार राज्यातील जनतेची दिशाभूल करत आहे मात्र रात्रनदिवस मेहनत करून एसटी कामगाराणा स्वतःच्या न्याय मागण्यासाठी आंदोलन करावे लागते ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. बीड तालुका काँग्रेस कमिटी व इंटक कामगार संघटना आपल्या सोबत असुन शासनाने आपल्या मागण्यांवर तत्काळ उपाययोजना कराव्यात असेही ते म्हणाले. यावेळी पाठिंब्याचे पत्र एस टी कर्मचारी कृती समितीचे महादेव खांडे, संतोष गणगे, कल्याण जाधव, बाबा डोळस, अरविंद इंगोले, नवनाथ टाकले, यांच्याकडे देण्यात आले. यापत्रावर काँग्रेस पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन रानबा जमाले, उपाध्यक्ष संदीप झिंजुर्के, सचिव सखाराम बेंगडे, दयानंद धुरंधरे, सुदाम भोपळे आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.



इंटकच्या (राष्ट्रीय मजदूर काँग्रेस) वतीने एसटी महामंडळ संपला पाठिंबा- रामधन जमाले

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ७ सप्टेंबर शनिवार रोजी माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी मा. संजय नागरगोजे, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. राजेश गुगळे उपस्थित राहणार आहेत. दि. ७ सप्टेंबर शनिवार रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता महाविद्यालयाच्या मिडिया हॉलमध्ये मेळावा आयोजित केलेला आहे. तरी सर्व माजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी संघाचे सर्व सदस्य तसेच कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या सर्व पालकांनी मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले आहे.

## ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या वतीने सरकारकडे ब्राह्मण समाजाच्या प्रमुख सात मागण्यांचे निवेदन सादर !

### सर्व मागण्यांवर सरकार सकारात्मक; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन - बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्यातील ब्राह्मण समाजासाठी सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व प्राप्त परिस्थितीनुसार आवश्यक ठरणाऱ्या प्रमुख सात मागण्यांचे निवेदन ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या वतीने सादर करण्यात आले. ब्राह्मण समाजाच्या सर्व मागण्यांवर सरकार सकारात्मक असुन सर्व मागण्या लवकरच पूर्ण करणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाला दिले असल्याची माहिती ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली आहे.



ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्यांच्या संदर्भाने सरकारच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाला आश्वासित करून अमृत संस्था कायम ठेवून लवकरच भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण करण्यात येईल असे ठोस आश्वासन दिले. त्याचप्रमाणे यावेळी ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या वतीने सरकारला ब्राह्मण समाजाच्या सात प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे सादर करण्यात आल्या. दिलेल्या निवेदनात अमृतमधून ब्राह्मण समाज बाहेर न पडता भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण व्हावे ,राज्यात स्वतंत्र मंत्रालय स्थापन व्हावे , ब्राह्मण समाजासाठी विशेष संरक्षण कायदा निर्माण व्हावा , ब्राह्मण समाजातील गरजवंत विद्यार्थ्यांना पुणे,ठाणे, संभाजीनगर,नागपूर नाशिक, कोल्हापूर, लातूर, अंबेजोगाई, नांदेड, अहमदनगर सह विविध ठिकाणी वसतिगृह उभारणे,शनिवारवाड्याचे पुनरुज्जीवन करीत सुशोभिकारणसाठी निधी उपलब्ध करुन देणे ,बाजीप्रभु देशपांडे यांचे घोडखिंड येथे स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करणे, राज्यातील पुरोहितांना व वैदिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने मानधन सुरु करणे अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांबाबत चर्चा करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ब्राह्मण समाजाच्या या सर्व मागण्या न्याय मागण्या असुन सरकार या सर्व मागण्या सोडविण्यासाठी सकारात्मक व कटिबद्ध आहे. येणाऱ्या काळात एकेक करून सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील. असे आश्वासन त्यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाला दिले असल्याची माहिती ब्राह्मण मुख्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी दिली आहे.

## पुस्तकांचे वाचन सोशल मीडियापेक्षा आयुष्याला दिशा देणारे ठरते-प्रा. साबळे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या महा वाचन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात उदंड प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध साहित्यिकांच्या पुस्तकांचे वाचन केले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषा साहित्याच्या पुस्तकांचे वाचन केले.



यामध्ये पु ल देशपांडे यांचे ' व्यक्ती आणि वल्ली ', शिवाजी सावंत यांचे 'छावा ', शेक्सपियर चे ' हॅम्लेट ' या पुस्तकांमधील उतारे वाचन करण्यात आले.महावाचन उत्सव स्पर्धेत महाविद्यालयातून १)कोमल तौर, २)प्रिया हरदास आणि३) रविराज तोंडे यांनी क्रमांक पटकावले.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे म्हणाले की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचे माध्यम वापरताना वेळेची मर्यादा ठेवली पाहिजे. त्या माध्यमातून आपण कोणत्या गोष्टी उपयोगाच्या आहेत ते लक्षात घ्यावे. विद्यार्थ्यांना स्वतःचे करिअर घडविण्यासाठी सकारात्मक वाचनाची गरज आहे. शासनाने चालू केलेल्या उत्सवातून प्रेरित होऊन जास्तीत जास्त चांगली पुस्तके वाचावीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. उपक्रमाचे संयोजन प्रा.प्रल्हाद तावरे, प्रा. डॉ.राजाराम जाधव, प्रा. राघवेंद्र मुळी,प्रा.परमेश्वर पवार, प्रा. स्वाती साखरे यांनी केले.

## सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांचे १५ सप्टेंबर रोजी प्रकाशन

### कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, खा.रजनीताई पाटील, डॉ.वृषालीताई किन्हाळकर, आ.नमिताताई मुंदडा, राजकिशोर मोदी यांची उपस्थिती


अंबाजोगाई । प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या ''असामान्य'', ''सहज सुचलं म्हणून'' आणि ''मंदीराचे गाव'' या तीन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळा १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता नगरपरिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लेखक सुदर्शन रापतवार, माध्यम पब्लिकेशन आणि माध्यम डिजिटल न्यूज नेटवर्क यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या तीन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यासाठी राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, राज्यसभा खासदार सौ.रजनीताई पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.वृषालीताई किन्हाळकर, आ.नमिताताई मुंदडा आणि महाराष्ट्र राज्य स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी हे उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी आपल्या प्रदीर्घ पत्रकारीतेच्या अनुभवातून सिध्द झालेल्या प्रगल्भ विचार आणि समग्र लेखणीतून लिहिलेल्या ''असामान्य'', ''सहज सुचलं म्हणून'' आणि ''मंदीराचे गाव'' ही तीन ही पुस्तकं माध्यम पब्लिकेशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आली आहेत. अंबाजोगाई सारख्या अर्धशहरी विभागात राहुन ही पुस्तकं निर्मितीच्या क्षेत्रात पहिल्यांदाच पाऊल ठेवलेल्या माध्यम प्रकाशनाने ही तीन ही पुस्तकांची निर्मिती अतिशय दर्जेदार पध्दतीने केली आहे. सलग चाळीस वर्षे सकारात्मक पत्रकारीतेला खतपाणी घालणाऱ्या सुदर्शन रापतवार यांचे साहित्य निर्मितीतील हे पहिलेच पाऊल असून एकाच वेळी तीन पुस्तकांचे लिखाण करून त्यांचे प्रकाशन करण्याचा हा त्यांचा धाडसी प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

नगरपरिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या प्रकाशन सोहळ्यास साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लेखक सुदर्शन रापतवार, माध्यम पब्लिकेशन आणि माध्यम डिजिटल न्यूज नेटवर्क या संस्थांच्या वतीने अंबाजोगाईत पत्रकारांशी वार्तालाप करताना करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील पहिला प्रयत्न :




ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा हा मराठवाड्यातील पहिलाच उपक्रम ठरावा असा आहे. एका पत्रकाराने लिहिलेल्या, त्याच पत्रकाराच्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या एकाच कार्यक्रमात प्रकाशन होणारा हा तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा हा पहिलाच उपक्रम ठरेल.

## तहसील व कृषी कार्यालय यांच्या निष्काळजीपणामुळे पी एम किसान योजना तालुक्यात बारगळली -सुरेश गवळी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात तहसील कार्यालय व कृषी कार्यालय यांच्या चाल ढकलीमध्ये पीएम किसान योजना पूर्णपणे बारगळली आहे अनेक शेतकरी या योजनेपासून या दोन्ही कार्यालयाच्या निष्काळजीपणामुळे वंचित राहिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी पीएम किसान योजना सुरू केली या योजनेतून शेतकऱ्यांना मानधनही मिळू लागले. परंतु सध्या ही योजना धारूर तालुक्यात बारगळी आहे. तहसील कार्यालय म्हणते कृषी कार्यालयाकडे जा कृषी कार्यालय म्हणते आमच्याकडे कर्मचारी नाहीत यामुळे ही योजना आम्ही चालू शकत नाहीत .या दोन्हीच्या निष्काळजीपणामुळे अनेक शेतकरी चकरा मारून परेशान झाले आहेत परंतु त्यांना न्याय मिळत नाही.तहसील कार्यालय की कृषी कार्यालय एकदा ठरवून घ्यावे कर्मचारीची नियुक्ती करावी व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेली पी एम किसान योजना सुरू ठेवावी अशी मागणी सुरेश गवळी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात त्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा अशी ही मागणी त्यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

## जाहिर प्रगटन

मा. श्री.व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२६९/२०२४ ॲड.आर.बी. नेवडे यांच्या मार्फत

बाबुराव रखमाची धट वि. निरंक

ज्यापेक्षा रखमाजी आसराजी धट, हे दिनांक २६.०१.२०२२ रोजी मौजे पेंडगाव ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार :- १ बाबुराव पि. रखमाजी घट, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा.पेंडगाव, ता.जि.बीड

२ पानकवर भ्र.नारायण डरपे, वय ६० वर्षे, घटा घरकाम, रा. पेंडगाव, ता.जि.बीड

३ सिंधु भ्र. रामप्रसाद खुळे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. शिवशंभु हौसींग सोसा., रूपीनगर, पुणे. ४ इंदु भ्र.लक्ष्मण कारंडे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा.चावल जनता नगर, कश्मिरा,काशिगाव-मिरा रोड (ईस्ट), ठाणे

अर्जदार क्र. १ हा मयत नामे रखमाजी आसराजी धट, यांचा मुलगा असून, अर्जदार कं. २ ते ४ था मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इत्तर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत रखमाजी आसराजी धट, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १४/१०/२०२४ आहे.

आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित
क.लिपीक

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, (व.स्तर) बीड

## मा.श्री.ए.एस.जगताप, दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) शिरुर (का) यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. २१२/२०२४**

अर्जदार : १) सविता भ्र.शरद टाक (विवाहानंतरचे नांव) बेबी पि.दिंगाबर बेद्रे (विवाहापुर्वीचे नांव) वय-४५ वर्षे, धंदा-नौकरी, रा. खोकरमोह ता. शिरुर (का) जि.बीड २) ऋषिकेश पि. शरद टाक, वय-२६ वर्षे, धंदा-नौकरी, रा. सदर ३) गौरी पि.शरद टाक, वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क्रं. १, रा. सदर ४) छगन पि. लक्ष्मण टाक, वय-७६ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त, रा. सदर ५) साखरबाई भ्र. छगनराव टाक, वय-७४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**विरुध्द निरंक**

दावा :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शरद पि. छगनराव टाक यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत शरद पि. छगनराव टाक यांचा मृत्यू दिनांक ३०-०६-२०१४ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत शरद पि.छगनराव टाक यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शरद पि. छगनराव टाक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/९/२०२४ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/१०/२०२४ आहे.

ॲड.व्ही.एस. मिसाळ

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, (क.स्तर) शिरुर (का)

# अतिवृष्टीमुळे बाधीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - कृषी मंत्री मुंडे

## गेवराई तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीची पहाणी करुन नुकसानग्रस्तांना दिला दिलासा

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळामध्ये ६५ मी.मी. पेक्षा जास्तीचा पाऊस झाल्यामुळे सर्वत्र अतिवृष्टी होवुन शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे बाधीत शेतकर्यांना थेट मदत करण्यात यावी यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असा शब्द कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी दिला आहे. गेवराई तालुक्यातील लोणाळा, अर्धमसला, तळेवाडी आदी ठिकाणी त्यांनी नुकसानाची पहाणी केली. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित त्यांच्या समवेत उपस्थित होते. भरपावसात कृषी मंत्र्यांनी शेतकर्यांच्या बांधावर जावुन नुकसानग्रस्तांना दिलासा दिला आहे.





राज्याचे कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील लोणाळा, अर्धमसला, तळेवाडी सह आदी भागातील नुकसानग्रस्त शेतीची बांधावर जावुन पहाणी केली. अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या आणि कापुस पिकावरील अकस्मीक मर (पॅरा विल्ट) मुळे त्रस्त असलेल्या शेतकर्यांशी अस्थेवाईकपणे संवाद साधला. तळेवाडी येथे भरपावसात त्यांनी नुकसानग्रस्त शेतीची पहाणी केली. बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्यासह गेवराई राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. माध्यमांशी बोतलांना कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे म्हणाले की, ज्या ठिकाणी २४ तासात अतिवृष्टी झालेली आहे त्या ठिकाणच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची गरज भासत नाही, असा एसडी आर एफ चा नियम आहे. बीड जिल्ह्यातील जवळपास सर्व महसुल मंडळात चोवीस तासात ६५ मी.मी. पेक्षा जास्तीचा पाऊस झाल्यामुळे तो भाग अतिवृष्टीखाली येतो त्यामुळे संपुर्ण बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेत जमीनीचे पंचनामे किंवा ई पिक पहाणी करण्याची गरज न भासू देता अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकर्यांना सरसकट थेट शासनाकडुन मदत दिली जावी याबाबत आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे पुढे म्हणाले की, खरडुन वाहुन गेलेल्या जमीनी, गाय, म्हैस या सारख्या पशुधनांचा मृत्यु झाला असल्यास अशा घटनांच्या बाबतीत पंचनाम्यांची गरज भासणार आहे. असे पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासकीय यंत्रणेला दिलेले आहेत. अतिवृष्टीचे मोठे संकट निर्माण झाले आहे, यातुन शेतकर्यांना दिलासा देण्याचे काम महायुती सरकार करत आहे. थकीत पिक विम्याच्या संदर्भात त्यांनी गेवराई येथे अधिकार्यांना कृषी विभागाने सुनावणी घेवुन मान्य केलेल्या गेवराई तालुक्यातील २५२२१ शेतकर्यांना तात्काळ पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. कृषी मंत्र्यांच्या दौर्यामुळे नुकसानग्रस्त शेतकर्यांना दिलासा मिळाल्याची भावना बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केली.

## बळीराजाला शंभर टक्के नुकसानभरपाई सह कर्जमाफी करा - गणेश बजगुडे



**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा व तालुक्यातील सर्वच महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली असताना बीड तालुक्यात २४ तासाहून अधिक काळ सततचा मुसळधार पाऊस झालेला असुन शेतकऱ्यांच्या जमिनीत पाणीच पाणी झाल्यामुळे उभे पीक व शेती देखील वाहून गेलेली आहे. सणासुदीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या खरिपाच्या सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असताना प्रशासनाने पांचनाम्याच्या नावावर वेळकाढूपणाची भुमिका नघेता सरसकट १०० टक्के नुकसान भरपाई सह कर्जमुक्ती करावी व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना विनाआट विनाविलंब मदत करण्यात यावी. त्याच बरोबर सोयाबीन कापुस दरवाढ, पीकविमा रक्कम तत्काळ मिळाली पाहिजे अश्या मागणीचे निवेदन आज बीड तालुका कॉंग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आले. यानिवेदणावर तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, इंटकचे जिल्हाध्यक्ष रमधन जमाले, सखाराम बेडगे, हनुमान घोडके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी; अनिलदादा जगताप यांच्या सूचना!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सर्वत्रच दोन दिवस मुसळधार पावसाने थैमान घातले असल्याने लाखो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. सोयाबिन, तूर, मुग, उडीद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे. काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेली आहेत. उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे. जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा



फटका बसला आहे. तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी यांना पत्रकाद्वारे केले आहे.

याबरोबरच बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून ५०० ते ६०० लोक सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनवर्सन करण्यात यावे .

तसेच बीड शहरानजीक असलेले बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. याबाबत देखील जिल्हा प्रशासनाने उपयोजना कराव्यात. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करावे अशा विविध सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत.

## कापसाच्या मर रोगावर तात्काळ उपायोजना करा -राजेंद्र आमटे




**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्याने पोटच्या पोरा पेक्षा जास्त जपलेलं कापसाचे पीक अचानक आलेल्या मर रोगा मुळे नेस्तनाबूत होत आहे. शेतात उभे असणारे एकर दोन दोन एक्कर पीक जमिनीला भुई सपाट होत आहे. आणि आपला वाझोटा कृषी विभाग शेतकऱ्याच्या कापसाच्या पिकाचे वाटोळे होत असताना शांत का? कृषी विभागाने तातडीने उपाय योजना करून कापसावर झालेल्या मर रोगावर नियंत्रण करावे कृषी विभाग मार्फत शेतकऱ्यांना तत्काळ रोग नियंत्रण साठी मदत देण्यात यावी मर रोगामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान तत्काळ थांबवण्यासाठी कृषी विभागाने उपाय योजना कराव्यात या मागणी साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय निवेदन देण्यात आले लवकरात लवकर शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई चे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडी वतीने तीव्र आंदोलन ◀◀ पान ३ वर

## गेवराई तालुक्यातील पिकांचे आतोनात नुकसान, ओला दुष्काळ जाहीर करा - मयुरी खेडकर

**गेवराई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणाने हिरावला आहे. मागील चार पाच दिवसांपासून गेवराई तालुक्यातील सर्व महसूल मंडळात जोरदार पाऊस पडत आहे. यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीन, भुईमूग, तुर आदी शेतातील खरीप पिके अतिवृष्टीमुळे वाया गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठा खर्च करुन जोपासलेली पिकांना बसलेला फटका लक्षात घेता, शासनाने गेवराई तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट भरपाई द्यावी, अशी मागणी मयुरी खेडकर-मस्के यांनी केली आहे.



यावर्षी जुनच्या पहिल्याच आठवड्यात मान्सूनचे आगमन होऊन पावसाची परिस्थिती चांगली राहिली. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत होऊन त्यांनी कपाशीसह इतर पिकांची लागवड केली. यानंतर देखील सातत्याने चांगला पाऊस झाल्याने पिकांची उगवण चांगली होऊन पिके जोमदार आली. पिके चांगली दिसून आल्याने शेतकऱ्यांनी देखील शेतातील पिकांच्या आंतरमशागतीसह खते, औषधे यावर मोठ्या प्रमाणात खर्च केलेला आहे. दरम्यान पिकांवर जो खर्च व्हायचा तो झालेला आहे, आता शेतकऱ्यांच्या पदरात पडण्याची वेळ असतानाच संपूर्ण गेवराई तालुक्यात मागील चार पाच दिवसांत मोठ्या प्रमाणावर ◀◀ पान ३ वर

## लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री शिंदे साहेबांचीच

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते सन्मानीय एकनाथजी शिंदे साहेब यांनी सर्व सामान्यांच्या हितासाठी अनेक योजणा अमलात आणल्या आहेत. यापैकीच एक म्हणजे अवघ्या महाराष्ट्रभरात लोकप्रिय ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आहे. महाराष्ट्रात सध्या सुरु असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा महिला भगिनी लाभ घेत आहेत. मात्र या लाभाचा सध्या

### राष्ट्रवादी अजित पवार गटाने फुकटचे श्रेय लाटू नये-सुरवसे



फायदा फक्त आणि फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित दादा पवार आणि त्यांचा गट घेत ◀◀ पान ३ वर

## २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना अकरा कोटींचे विमा कवच

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपक्रमाचे पत्रकारांकडून कौतुक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र विक्रेते अशा एकूण २२० जणांना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ११ कोटींचे अपघाती विमा कवच दिले आहे. यासंदर्भात बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने विमा वितरणाचा कार्यक्रम घेतला होता. या उपक्रमाचे



पत्रकारांकडून कौतुक करण्यात आले.

बीडच्या वृत्तपत्र क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून विविध विभागात कर्मचारी कार्यरत आहेत. ◀◀ पान ३ वर

## बंद पथदिव्या सह इतर मागण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना कॉंग्रेस घालणार घेराव

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील नगर परिषदेवर प्रशासक आल्यापासून शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत माजलगाव शहराची सध्या बकाल अवस्था झाली असून याला सर्वस्वी जबाबदार नगर परिषद प्रशासन असल्याचे कॉंग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे निवेदनात ते पुढे म्हणाले कि.



नगर परिषदेवर बॉडी अस्तित्वात असताना आ.सोळंके हे आढावा घेण्याच्या नावाखाली पंधरा दिवसाला न.प.मध्ये येऊन विकास कामांचा निधीवर मनमानी करता यावी म्हणून निधी सा.बांधकाम विभागाला वर्ग करून व तसा ठराव घेण्याच्या सूचना नगरसेवकांना देत होते परंतू प्रशासक आल्यापासून शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या असताना आ.महोयदयांना मात्र न.प.येऊन आढावा घेयला वेळ नाही

## रस्त्याचे काम न करता बीले उचलणारावर कारवाई करावी या मागणीसाठी वडखेल ग्रामपंचायत समोर १३ सप्टेंबर पासुन उपोषण

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील वडखेल ते वडखेल तांडा अप्रोच रस्त्यासाठी मंजुर असलेले पाच लाख रुपये काम न करताच अधिकारी व गुत्तेदारांनी संगणमत करून उचलले आहेत. पैसे उचलणारा वर कारवाई करावी व रस्त्याचे काम करावे या मागणीसाठी वडखेल येथील ग्रामस्थ १३ सप्टेंबर पासुन वडखेल ग्रामपंचायत कार्यालया समोर उपोषणास बसणार असल्याचे निवेदन गणेश देवकते यांनी दिले आहे.

बीडच्या जिल्हाधिकारी यांना मंगळवारी (ता.३) निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत वडखेल ते वडखेल तांडा रस्त्याच्या मजबूती करणणासाठी पाच लक्ष रुपयांचा निधी सन २०२३ ते २०२४ च्या कार्यकाळात जिल्हा नियोजन समितीच्या नियोजनातून मंजूर करण्यात आला होता. सदरील रस्त्याचे काम




कसल्याही प्रकारचे न करता शासनाचा निधी उचलून घेतला आहे. रस्त्याचे काम न करता अधिकारी यांच्या सगंमताने गुत्तेदार यानी बनावट एमबी तयार करून पूर्ण बिल उचलून घेतले आहे. सबंधीत रस्ता न करता वडखेल ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. शासनाच्या पाच लक्ष रुपये निधी उचलून शासनाची फसवणूक केली आहे. या प्रकरणातील दोषी असणाऱ्या अधिकारी व सबंधित एजन्सी गुत्तेदार यांच्यावर भ्रष्टचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा. शासनाने मंजूर केलेल्या रस्त्याचे काम तात्काळ करावे या मागणीसाठी वडखेल ता. परळी वैजनाथ येथील सर्व लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ १३ सप्टेंबर २०२४ रोजी वडखेल ग्रामपंचायत कार्यालय समोर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे भटक्या विमुक्त सेलचे तालुकाध्यक्ष गणेश देवकते यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संबंधित शासकिय यंत्रणेला देण्यात आले आहे.

## आष्टी सह परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढत असताना पोलीस प्रशासन मात्र झोपेचे सोंग घेत आहे का?

### नागरिकांचा संतप्त सवाल

आष्टी । प्रतिनिधी

एकीकडे आष्टी सह परिसरातील काही गावांमध्ये गेल्या काही दिवसापासून चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे परंतु स्थानिक पोलिसांचे याकडे प्रचंड दुर्लक्ष होताना दिसत असल्याने पोलीस झोपेचं सोंग घेत आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहेत दुसरीकडे मात्र चोरांची चांदी होत असल्याचे चित्र असून सर्वसामान्य जनता ही रात्रभर जागून गस्त घालत असल्याचे दिसून येत असल्याने आता तरी सणासुदीच्या दिवसांमध्ये पोलीस प्रशासन खडबडून जागे होऊन ॲक्शन मोडवर येईल ही अपेक्षा इथल्या स्थानिक नागरिकांना आहे.

आष्टी तालुक्यात यंदा सरासरीपेक्षा जास्तीचा पाऊस झाला असून अजूनही पावसाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत नाही या कारणामुळे ग्रामीण भागांमध्ये विजेचा लपंडाव सुरू आहे याचाच गैरफायदा घेत चोरांची मात्र चांदी होतानाचे दिसून येत आहे चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याने तालुक्यातील जनता भयभीत असून ग्रामीण भागामध्ये सद्यस्थितीत रात्रीचे गस्त घालण्याचे प्रमाण वाढले आहे शिवाय चोरी झाल्याची चर्चा रंगून ऐकायला मिळत आहे परंतु पोलीस स्टेशनची पायरी चढायला कोणीही तयार नाही कारण कितीही फोन केले तक्रारी केल्या किंवा लेखी अर्ज दिले तरी स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कुठलीच हालचाल या कामे होताना दिसत नसल्याने नागरिकांनी पोलिसांच्या वर असलेला आपला भरोसा आता राहिला नसल्याचे जागोजागी चर्चिले जात असून स्थानिक नागरिकच आता हातात दंडुका घेऊन रात्र रात्रभर जागत असल्याचे विदारक चित्र आष्टी तालुक्यामध्ये आहे पोलीस प्रशासनाने यावर आता तरी खडबडून जागे होणे गरजेचे असून आगामी काळात गणेशोत्सव नवरात्र दसरा दिवाळी असे मोठ्या प्रमाणात हिंदू धर्मांचे असणारे सणासुदीचे दिवस लक्षात घेता पोलिसांनी ॲक्शन मोडवर येऊन अशा चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि जनतेला संरक्षण द्यावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार दि.०६ सप्टेंबर २०२४ । पान ७

# फरासखाना पोलीस स्टेशनची कामगिरी परप्रांतीय टोळीस अटक

**पुणे । प्रतिनिधी**

दिनांक २५/०८/२०२४ रोजी फिर्यादी त्याचे मुळगाव बिहार राज्य येथे जाण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशन येथे तिकीट बुकींग खिडकीत चौकशी करीत असतांना, एक अनोळखी इसम फिर्यादी जवळ येवुन, त्यास ऑनलाईन तिकीट काढुन देतो असे सांगुन फिर्यादी यांना डुल्या मारुती मंदिरासमोर गणेश पेठ पुणे येथे घेवुन जाऊन तेथे त्याचे इतर अनोळखी साथीदारांचे मदतीने ऑनलाईन तिकीट बुक करुन देतो असे भासवुन, फिर्यादी यांचा मोबाईल फोन, बॅकेचे ए.टी.एम.कार्ड, आधार कार्ड तसेच पॅनकार्डची मागणी करुन, फिर्यादी यांना मारहान करुन, बॅक खात्याचा पासवर्ड जबरदस्तीने मागणी करुन, मोबाईल फोन, बॅकेचे ए.टी.एम.कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड तसेच रोख रक्कम असे घेवुन पळुन गेले होते. त्यानंतर आरोपीनी त्यांचे इतर साथीदारांचे मदतीने दिनांक २५/०८/२०२४ रोजी व दि. २६/०८/२०२४ रोजी फिर्यादी यांचे ए.टी.एम. कार्डचा गैरवापर करुन, त्यांचे खात्यातुन एकुण ३,०३,८००/- रु काढुन घेतले म्हणुन फिर्यादी यांनी *फरासखाना पोलीस स्टेशन गु.र.नं. १७१/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३१०(२),११५ (२), ३५२, ३५१ (२) (३), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे*



दाखल गुन्हयाचे गाभिंर्य लक्षात घेता फरासखाना पोलीस स्टेशन येथील प्रभारी श्री.प्रशांत भस्मे सर यांनी तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी महत्वाच्या सुचना व मार्गदर्शन केल्यानंतर, तपास पथकातील पोलीस अमंलदार यांनी घटनास्थळाचे सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासुन, त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत तपास केला असता, तपास पथकातील पोलीस अमंलदार गजानन सोनुने व महेश राठोड यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अशा प्रकारे गुन्हे करणारे परप्रांतीय संशयीत इसम हे पुन्हा गुन्हा करण्याचे हेतुने डुल्या मारुती चौकात उभे असल्याचे खात्रीशीर बातमीवरुन, तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक, श्री अरविंद शिंदे तसेच तपास पथकातील स्टाफ असे घटनास्थळी जावुन, दोन संशयीत इसम नामे

१)राजा युनुष पिंकु, वय १९ वर्षे, रा. राज्य - बिहार २) मोहम्मद सुलतान मोहम्मद तौहिद शेख, वय १८ वर्षे, राज्य बिहार*

यांना ताब्यात घेवुन, त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले असता, त्यांना गुन्हयात अटक करुन, इतर ८ साथीदारांना अटक केले ३)मुन्ना जोधन साह,वय ४१ वर्षे ४)राकेश कपलेश्वर पासवान,वय ३२ वर्षे, ५) बिशम्बर मोसफिर दास वय २५ वर्षे ६)धर्मेन्द्रकुमार असरफिया साह वय २८ वर्षे ७) जितेन्द्रकुमार मोहन सहनी वय २६ वर्षे ८)राजेद्रकुमार सुखदेव महतो, वय २८ वर्षे ९) दिनेश हरी पासवान वय २७ वर्षे १०) पिताम्बर मोसाफिर दास वय २९ वर्षे, सर्व मुळ रा. बिहार राज्य

यांना ताब्यात घेवनु त्यांचे घरझडती दरम्यान त्यांचे बॅगमधुन वेग-वेगळ्या कंपनीचे ४१ नग मोबाईल फोन, रोख १,४३,०२०/- रुपये, फिर्यादी व इतर सांक्षीदार यांचे वेग-वेगळया कंपनीचे ४ नग पाकीट त्यामध्ये ३ नग वेग-वेगळ्या इसमांचे आधार कार्ड, २ नग पॅनकार्ड, ९ नग वेग-वेगळ्या कंपनीचे ए.टी.एम.कार्ड असा सर्व मिळुन ५,७७,१९०/- रु किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, दाखल गुन्हा अवघ्या २४ तासात उघड करण्यात आला.

आरोपी यांची गुन्हा करण्याची पध्दत :- सर्व आरोपी हे मुळ बिहार राज्य येथील रहिवासी असुन, ते दहिहंडी व गणेश उत्सव दरम्यान पुणे येथे येतात, आणि रेल्वे स्टेशन येथे थांबुन, परगावी जाणाया लोकांना ऑनलाईन तिकीट काढुन देण्याचा बहाना करुन, त्यांना निर्जन स्थळी घेवुन जावुन, इतर साथीदाराचे मदतीने जबरदस्तीने मारहाण करुन, ए.टी.एम., पॅनकार्ड, आधार कार्ड हिसकावुन घेवुन जाणे व नंतर वेग-वेगळ्या माध्यमातुन कार्ड स्वॅप करुन त्याव्दारे पैसे काढुन घेणे. तसेच पोलीसांना काहीएक सुगावा लागु नये त्यासाठी अंगावरील कपडे तसेच आधार कार्ड,ए.टी.एम.कार्ड फेकुन पुरावा नष्ट करणे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त संदिपसिंह गिल,मा.सहा.पो.

*आयुक्त फरासखाना विभाग श्रीमती नुतन पवार, यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक,प्रशांत भस्मे, पो.नि.(गुन्हे) अजित जाधव, स.पो.नि. वैभव गायकवाड, पो.उप-नि. अरविंद शिंदे, सहा.पो.फौ.मेहबुब मोकाशी,पोलीस अमंलदार, तानाजी नागरे, नितीन तेलंगे, प्रविण पासलकर,वैभव स्वामी, विशाल शिंदे,महेश राठोड,गजानन सोनुने, नितीन जाधव, संदिप कांबळे, समिर माळवदकर,सुमित खुट्टे,अर्जुन कुडाळकर, महेश पवार,शशिकांत ननावरे,चेतन होळकर, यांनी केली

# बीजेएस वाघोली संघाला विजेतेपद

## राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेचे 'एमआयटी एडीटी'त यशस्वी आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा कबड्डी संघटना व विद्यार्थी कल्याण विभाग एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीजेएस वाघोली महाविद्यालयाने १८ गुणांनी बाजी मारली.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्याने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीजेएस वाघोली संघाने मराठवाडा मित्र मंडळ इंजिनिअरींग महाविद्यालयाचा (एमएमसीओई) ५५-३७ अशा दणदणीत फरकाने पराभव केला. बीजेएस वाघोलीच्या यशात हर्षल दौधार व दर्शन रणदिवे या खेळाडूंनी जोरदार आक्रमणांसह संघाच्या गुणांत भर घातली. तर दुसरीकडे, एमएमसीओईकडून ऋषीकेश सोनवणे याने बहारदार कामगिरी केली खरी, परंतू तो संघाला विजयापर्यंत पोहोचू शकला नाही.




पहिल्या सत्रात बीजेएस वाघोलीने २ लोण व २ बोनससह एकूण २२ गुणांची कमाई केली. दुसरीकडे, एमएमसीओईने देखील चांगली झुंज देताना १९ गुण मिळविले. मात्र, सामन्याच्या दुसऱ्या सत्रात, बीजेएस वाघोलीच्या खेळाडूंनी केलेल्या आक्रमणासमोर एमएमसीओईच्या खेळाडूंची पुरती धांदल उडाली. या निर्णायक सत्रात बीजेएसने तब्बल ३३ गुणांची लयलूट केली, तर एमएमसीओई केवळ १८ गुण मिळवता आले. ज्यामुळे, १८ गुणांच्या फरकासह बिजेएस वाघोलीला विजेतेपदाचा मान मिळाला.

विजेत्या संघाला, माजी कबड्डीपटू आप्पासाहेब दळवी, क्रीडा विभाग संचालक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा.पद्माकर फड, आशियाई रोइंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविणारे प्रा.आदित्य केदारी, विद्यार्थी कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.सुराज भोयार, ऑलिंपियन बॉक्सर मनोज पिंगळे यांच्या हस्ते करंडक, रोख रक्कम अशा स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कबड्डी प्रशिक्षक क्षिप्रा पैठणकर यांनी विशेष मेहनत घेतली.

# गणेश मंडळाना प्रसादाबाबत नियमांचे पालन करण्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सूचना

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सव कालावधीत गणेश मंडळांनी प्रसाद तयार करताना आणि वाटताना स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच प्रसाद स्वतः तयार करून भाविकांना वितरीत करणाऱ्या गणेश मंडळांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाकडे नोंदणी करावी, अशा सूचना अन्न व औषध प्रशासनाने दिल्या आहेत.

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमण २०११ अंतर्गत गणेश मंडळानी काळजी घ्यावी. भाविकासाठी तयार केलेला प्रसाद हा काचेच्या झाकणात किंवा पारदर्शक प्लास्टिकच्या आवरणात झाकून ठेवावा. जेणेकरून प्रसादाला धूळ, माती, माशा, मुंग्या या व इतर किटकांचा प्रादुर्भाव होणार नाही. भाविकांना शिळे अन्नपदार्थ सेवनास देऊ नयेत. प्रसाद हाताळणाऱ्या सर्व व्यक्तींचे कपडे स्वच्छ असावेत, त्यांनी साबणाने हात स्वच्छ धुवूनच कामास सुरुवात करावी. संसर्गजन्य आजार असणाऱ्या व्यक्तीने प्रसाद बनविणे व हाताळण्याची कामे करू नयेत.

प्रसाद हाताळणाच्या व्यक्तीने वैयक्तिक स्वच्छतेच्या सर्व नियमांची काळजी पूर्वक अंमलबजावणी करावी. नाक, कान, डोके, केस खाजवणे वा डोळे चोळणे, शिंगणे, थुंकणे, नाक शिंकरणे, तंबाखु वा धुम्रपान करणे टाळावे. प्रसाद हाताळणाऱ्या व्यक्तीची नखे व्यवस्थीत कापलेली असावीत व त्यात घाण साचलेली असू नये. हात पुसण्यासाठी स्वच्छ कपडा वापरावा. प्रसाद तयार करणाऱ्या व्यक्तीने हात मोजे व ॲप्रन घालावा तसेच केस संपूर्णपणे झाकणारी टोपी व तोंडाला मास्क घालावा.

प्रसाद स्वतः तयार करून भाविकांना वितरीत करणाऱ्या गणेश मंडळांनी https://foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावर जाऊन १०० रुपये शुल्क भरून अन्न व औषध प्रशासन यांचेकडे नोंद करून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. कच्च्या अन्न पदार्थाची खरेदी बिले बाळगावीत व कच्चे अन्न पदार्थ परवानाधारक दुकानातून खरेदी करावीत, असेही अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त (अन्न) सु. ग. अन्नपुरे यांनी कळविले आहे.

# मूर्ती आमची किंमत तुमची; पुणे महापालिकेचा उपक्रम

पुणे - महापालिकेने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पुणेकरांसाठी खास उपक्रम राबविला आहे. नागरिकांनी पीओपीच्या मूर्ती घेण्यापेक्षा शाडू मातीची मूर्ती घ्यावी यासाठी 'मूर्ती आमची, किंमत तुमची' हा उपक्रम हाती घेतला आहे. घोले रस्ता आर्ट गॅलरीमध्ये शुक्रवारी (ता.६) व शनिवारी (ता.७) सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत मूर्ती उपलब्ध असणार आहेत. अशी माहिती महापालिका प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.




महापालिकेचा पर्यावरण विभाग आणि लिबर्टी अर्थवेअर आर्ट या संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जाणार आहे. शाडू मातीचा वापर करून भक्ती संगम प्रकारच्या मातीच्या मूर्ती उपलब्ध करण्यात आल्या आहे. यामूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ही अवघ्या दोन तासात पाण्यात विरघळते. घरी मूर्ती विसर्जित केल्यास ही माती कुंडीमध्ये वापरता येऊ शकते.

नागरिकांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा, घरी गणपती बसविताना नैसर्गिक साहित्य, जैवविघटनशील साहित्याचा वापर करावा. पीओपीची मूर्ती न वापरता नागरिकांनी शाडू मातीच्या मूर्ती खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

मूर्ती दान करा, खत मिळवा

महापालिकेने विसर्जनासाठी हौदाची सोय केली आहे. पण त्याच सोबत मूर्ती दान संकलन केंद्रही सुरु केले आहेत. यंदा मूर्ती दान केल्यास नागरिकांना तीन किलोची खताची पिशवीही भेट दिली जाणार आहे. यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाकडे १ हजार याप्रमाणे एकूण १५ हजार खताच्या पिशव्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पर्यावरण पूरक गणेशोत्सवासाठी हा उपक्रम सुरु केला आहे.

# बाल विवाह निर्मुलनाकरीता दिपा मुधोळ-मुंडे यांना स्कॉच संस्थेचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मुलन कार्यक्रम उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक दिपा मुधोळ-मुंडे यांना स्कॉच राष्ट्रीय पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला आहे.



स्कॉच संस्थेकडून विविध क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीकरीता दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो.श्रीमती मुधोळ ह्या बीड जिल्हाधिकारी असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात बाल विवाह रोखण्यासाठी विविध सकारात्मक पाऊले उचलण्यात आली. परिणामी बाल विवाह थांबविण्यात प्रशासनाला यश आले. याच कामाची दखल घेत स्कॉच संस्थेच्यावतीने त्यांची निवड केली आहे.

स्कॉच संस्थेच्यावतीने नवी दिल्ली येथे २१ सप्टेंबर रोजी आयोजित हा पुरस्कार वितरण सोहळा श्रीमती मुधोळ यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# तोतया दिव्यांग कल्याण आयुक्ताने घातला ३९ लाख रुपयांचा गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

एका तोतयाने दिव्यांग कल्याण आयुक्त असल्याची बतावणी करून दिव्यांग कोट्यातून तुम्हाला रेल्वे स्थानकात स्नॅक्स सेंटर आणि शहरात मद्यविक्रीचा परवाना काढून देतो, असे सांगून एका दिव्यांगाची ३९ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी बिबवेवाडी येथील ४३ वर्षीय बांधकाम ठेकेदाराने बिबवेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी विजय दामोदर म्हस्के (रा. नातेपुते, सोलापूर), संजय कुलकर्णी ऊर्फ के. के. राव आणि एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग आहेत. चार वर्षांपूर्वी त्यांच्या एका मित्राने त्यांची आणि म्हस्केची ओळख करुन दिली होती. तेव्हा म्हस्के याने तो दिव्यांग आयुक्त असल्याचे सांगितले होते. म्हस्के याने फिर्यादीला लग्नासाठी मुलगी पाहायला सांगितले होते. त्यानिमित्ताने दोघांचे बोलणे सुरू होते. दरम्यान, पुणे रेल्वे स्थानक येथे प्लॅटफॉर्मवर स्नॅक्स सेंटरसाठी स्टॉल मिळेल का अशी विचारणा फिर्यादीने म्हस्केकडे केली होती. त्यांनीही त्यास होकार दिला होता. मात्र, त्यासाठी दोन लाख रुपये लागतील, असे सांगून फिर्यादीकडून पैसे घेतले. तसेच, मी दिव्यांग आयुक्त आहे, तोपर्यंत मोठा फायदा करून घ्या, अशीही बतावणी केली. त्याने फिर्यादीला दिव्यांग कोट्यातून वाईन शॉपचे लायसन्स मिळवून देतो, असेही आमिष दाखविले. त्याकामासाठी ४८ लाख रुपये खर्च येणार आहे. तुम्हाला त्यासाठी लागणार्या साहित्यासाठी केंद्र सरकारकडून एक कोटी ३६ लाख रुपये आणि राज्य सरकारकडून ५६ लाख रुपये अनुदान मिळेल, असे सांगितले. तक्रारदाराने आरोपीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून डिसेबर २०२३ ते मार्च २०२४ या काळात आरोपीच्या बँक खात्यात ३९ लाख ८३ हजार रुपये भरले.

# संदीप सिंह गिल यांची पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षकपदी नियुक्ती

## पुणे पोलीस उपायुक्त पदी तेजस्वी सातपुते

पुणे : पोलिस उपायुक्त संदीप सिंह गिल यांची पुणे ग्रामीण पोलिस अधिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर बृहन्मुंबई पोलिस उपायुक्त तेजस्वी सातपुते यांची पुणे पोलिस उपायुक्त पदी बदली करण्यात आली आहे. राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकार्यांच्या बदल्यानंतर काही उपायुक्त अधीक्षक दर्जाच्या अधिकार्यांची बदली होण्याची शक्यता होती.



गुरुवारी रात्री गृहविभागाने यात काही पोलीस अधिक्षक व उपायुक्त यांच्या बदल्या केल्या आहेत. दरम्यान मावळते पुणे ग्रामिण पोलीस अधिक्षक पंकज देशमुख यांची बृहन्मुंबई येथे उपायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी संदीपसिंह गिल यांची नियुक्ती केली आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये गिल यांनी पुण्यात उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली होती. शहराचा हृद्य समजल्या जाणार्या मध्यभाग आणि पेठांचा परिसर असणार्या परिमंडळ एकच्या उपायुक्त पदी त्यांची नियुक्त करण्यात आली होती. गणेशोत्सव काळात परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त हे अतिशय महत्वाचे पद समजले जाते. गणेशोत्सवात त्यांनी केलेले कामकाज कौतुकास्पद होते. मागच्या वर्षीच्या गणेशोत्सवात संदीप गिल यांच्या नावने देखावे लागले होते.

# रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात समृध्दी येईल-उपसंचालक महेंद्र ढवळे

पुणे (प्रतिनिधी) रेशीम शेती व्यवसाय शेतीस पूरक व्यवसाय म्हणून न करता तो मुख्य व्यवसाय म्हणून करावा. रेशीम शेती हा शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी शाश्वत पर्याय आहे. रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांच्या अडीअचणी दूर होतील. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या जीवनात समृध्दी येईल त्यासाठी जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेती करावी असे आवाहन रेशीम संचालनालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे यांनी केले.

रेशीम संचालनालयाच्यावतीने देण्यात येणारे विभागस्तरीय रेशीम रत्न पुरस्कारांचे प्रदान यशस्वी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना यशदा येथे आयोजित कार्यक्रमात श्री.ढवळे यांच्याहस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग विभागाच्या उपसचिव श्रद्धा कोचरेकर, प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहाय्यक संचालक कु.डॉ.कविता देशपांडे, कृषी विभागातील प्रक्रिया विभागाचे उपसंचालक सुनिल बोरकर, जिल्हा रेशीम विकास अधिकारी संजय फुले, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पवार, अधीक्षक अविनाश खडसने यावेळी उपस्थित होते. रेशीम शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध योजनांची अंमलबजावणी करत आहे असे सांगून या योजनांचा लाभ घेऊन मोठया संख्येने शेतकरी लखपती झाले असल्याचे श्री.ढवळे म्हणाले. आज रेशीम उद्योगातील शेतकऱ्यांना रेशीम उत्पादनाविषयी शास्त्रोक्त माहिती होण्यासाठी एका क्लिकवर रेशीम नकाशा तयार करण्यात आला आहे. याचा अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. याशिवाय शेतकऱ्यांचा फायदा व्हावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी रेशीम रत्न पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रवास रेशीम पिकाची काडी लावण्यापासून माडीपर्यत व माडीपासून गाडीपर्यत आणि आता तर परदेशवारी असा प्रवास होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

रेशीम उत्पादनात अडचणी असल्या तरी त्या फक्त काही काळासाठी असतात, त्यासाठी शासनातर्फे वेळोवेळी मदत करण्यात येते. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून त्यांचे उत्पन्न वाढीसाठी शासन



नेहमी मदत करते, त्यासाठी रेशीम शेती करावी असे आवाहन केले. पुढील काळात राज्यात सुमारे पन्नास हजार एकरावर रेशीम शेती करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्यात येईल असे श्री.ढवळे यांनी सांगितले.

राज्यात अनेक शेतकरी रेशीम शेतीच्या माध्यमातून चांगले उत्पादन घेत आहेत. रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून शेतीची कामे करताना त्यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी धुरळणीसाठी आरोग्य किट आणि विविध साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्याची मागणी करत आहे. याचा शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन श्री.ढवळे यांनी दिले.

वस्त्रोद्योग विभागाच्या उपसचिव श्रद्धा कोचरेकर म्हणाल्या की, मनुष्यबळाच्या बाबतीत रेशीम विभाग इतर विभागाच्या तुलनेत मागे आहे. रेशीम शेतीला पुढे नेण्यासाठी वाढीव मनुष्यबळाला मंजूरी मिळावी यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव सादर करण्यात येईल.श्री.सुनिल बोरकर म्हणाले की,रेशीम शेतीमध्ये चांगले उत्पन्न मिळते. त्यासाठी युवकांनी नोकरीच्या मागे न लागता रेशीम शेतीकडे वळावे. अल्प कालावधीमध्ये शेतकऱ्यांना लाखांमध्ये उत्पन्न मिळत असून हे यश इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणारे आहे. श्री.सुनिल पवार यांनी रेशीम उत्पादकांनी ई-नाम या पारदर्शक प्रणालीचा रेशीम विक्रीसाठी लाभ घेण्याचे आवाहन केले. सहायक संचालक कु.देशपांडे यांनी प्रास्ताविकामध्ये रेशीम संचालनालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजना, रेशीम शेतीचे फायदे, नवीन तंत्रज्ञान याविषयी माहिती दिली. जिल्हा रेशीम विकास अधिकारी संजय फुले यांनी सूत्रसंचलन केले तर रेशीम विकास अधिकारी राजेश कांबळे यांनी आभार मानले.उच्च व तंत्रशिक्षण तथा वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा अभिनंदनपर संदेश वाचून दाखविण्यात आला.

यावेळी मान्यवरांच्याहस्ते विभागात सर्वाधिक उत्पन्न घेतलेल्या रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना रेशीम रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुरस्कारामध्ये प्रथम पुरस्कार रुपये अकरा हजार, द्वितीय साडे सात हजार, तृतीय पाच हजार तसेच शाल, साडी व प्रमाणपत्र असे स्वरुप होते. रेशीम संचालनालयातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पुणे विभागातील रेशीम रत्न पुरस्कार्थी

जिल्हा- शेतकरी

पुणे- राहुल डोईफोडे, अमोल चांदगुडे, हनुमंत गरगडे

सांगली-बाबासाहेब निकम, अशोक चिप्रीकर

सातारा-प्रमोद विष्णू भोसले, सुमन प्रकाश खाडे पाटील, सुनिल कराडे,

सोलापूर-जयश्री पाडुंरग विर, रामा पालवे, विनोद केचे

कोल्हापूर-शिवाजी जगताप, सुभाष पाटील, विश्वास खोत

अहमदनगर-विजय जाधव, गोविंद गोरे, बाबासाहेब डोळे,

नाशिक,जळगाव-पंडित भोये, वैशाली राजेश पाटील, माधव हागवणे, मधुकर पाटील

उत्कृष्ट कार्यासाठी पुरस्कारप्राप्त अधिकारी, कर्मचारी

कु.डॉ. कविता देशपांडे, प्रादेशिक सहायक संचालक, अविनाश खडसाने, अधीक्षक, रेशीम विकास अधिकारी विनित पवार, प्यारसिंग पाडवी, बापू कुलकर्णी, राजेश कांबळे, संजय फुले, पोपट इंगळे, संदिप आगवणे, भगवान खंडागळे. वरिष्ठ क्षेत्र सहायक कमलेश हजारे, दिलीप आमराळे, प्रथमेश शिर्के, पवन कळमकर, चंद्रकांत पाटील, सुनिल पाटील, विजय दळवी, बाळासाहेब माने, शाम मैंडकर, सारंग सोरते, शिवानंद जोजण, श्रीकृष्ण गुरव, सुरेश खरुडे.